भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ स्थापना १९८१

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)



वर्ष १२ वे | एप्रिल-जून २०१६ | अंक १ ला

**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर** मो.नं ९३२६८२६८८४

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर** मो.नं ९८५०९७९७०६

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी** मो.नं ९४४९०५१६५३

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**

**श्री. गणेश गुर्जर**

पुणे, ९८९०९९०११३

**श्री. श्रीगजानन गुर्जर**

पुणे, ९९७०१७४८१८

**शहर प्रतिनिधी :**

श्री. विजय अंबर्डेकर, मुंबई, ९८१९८८५६६५

श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३

श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली ९८३३१६३६५९

श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५

सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६

सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३

श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००

श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७

श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१

श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४

श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४

श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२

श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८

सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५

श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदूर्ग, ९४२३८८०१३८

श्री. गजानन साईनेकर, गोवा, ९९२३७९९६९७

**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com

**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - गणेश गुर्जर**

# आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/- (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**- गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पुर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |

**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


| | |
|---|---|
| बकुळ फुले... | ४ |
| काव्यपुष्पांजली... | ५ |
| ठाणे शाखेमध्ये तिळगुळ समारंभ संपन्न... | ७ |
| मकरसंक्रांत उत्सव व ज्येष्ठ ज्ञातिबांधव सत्कार कार्यक्रम... | ८ |
| व्यक्तीविशेष - डॉ. भगवंत कळके.... | ९ |
| खाद्यविविधता | १० |
| अभिनंदन व शुभेच्छा! | ११ |
| परिकथेतील राजकुमार ऽऽ!... | १४ |
| 'शिशिर ऋतूचं गान!'... | १५ |
| साठवणं आठवणींची - य. वि. हर्डिकर... | २१ |
| सोने चांदी युक्त भूतलावरील अमृत गोमूत्र... - डॉ. प्रमोद प्रभाकर मोघे | २२ |
| 'आमचे अण्णा' ... श्री. वैशाली के. देसाई | २३ |
| व्यक्तिपरिचय - श्री. गंगाधर विष्णू ठेकेदार | २४ |
| कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचा जागतिक महिला दिनाचा समारंभ... | २५ |
| मधुमेहविषयक संशोधनासाठी हर्डीकर दाम्पत्याची निवड | २६ |
| सत्यकथा अघोरी तांडव, गणपती मूर्तींच्या थैमानाचे! | २७ |
| नरेन्द्र पानवलकर : एक बहुआयामी व्यक्तिमत्व | ३० |
| पाणी वाचवण्याचे घरातील सहज करण्याजोगे उपाय | ३१ |


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **– संपादक**

# संपादकीय


सप्रेम नमस्कार

नवीन वर्ष सुरू झाले आणि महासंघाच्या कार्याला अधिक गती मिळाली. आपणांस यापूर्वीच सूचित केले आहे, की महासंघाची धर्मादाय आयुक्त कार्यालयांत सोसायटी म्हणून नोंदणी झाली. त्यानंतर ३ मार्च २०१६ रोजी महासंघास विश्वस्त संस्था म्हणून मान्यता धर्मादाय आयुक्तांनी दिली आणि याच महिन्यात महासंघास पॅनकार्डही मिळाले. त्यामुळे महासंघ हा आता कायदेशीर बाबी पूर्ण करून आपले २५वे वर्ष आनंदात साजरे करत आहे.

याचबरोबर महासंघाने रौप्य महोत्सवासाठी कोअर कमिटी स्थापन करून त्या माध्यमातून दरमहा वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेऊन कार्यक्रमास अंतिम स्वरूप दिले. या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रात ज्या कऱ्हाडे ब्राह्मण बांधवांनी उत्कृष्ट कार्य  केले अशा ३३ मान्यवरांचा सत्कार करण्याचे ठरविण्यात आले. हा कार्यक्रम निश्चितच उत्तम होणार याबद्दल शंकाच नाही. महासंघाने या कार्यक्रमानिमित्ताने कऱ्हाडे ज्ञातीची माहिती असलेली त्याचप्रमाणे प्रत्येक संघाची माहिती असलेली ‘कऱ्हाडा तितुका मेळवावा’ ही स्मरणिका तयार केली असून दि. १० एप्रिल २०१६ च्या कार्यक्रमात सौ. इला भाटे यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. ज्या सभासदांना ही स्मरणिका हवी असेल त्यांनी त्याची मागणी आपल्या संघामध्ये नोंदवावी.

गुढीपाडवा म्हणजे हिंदू नववर्षाचा पहिला दिवस. या दिवशी आपण काही संकल्प मनात करत असतो व तो या वर्षी कृतीत आणण्याचा प्रयत्न करतो. या वर्षी म्हणजे १ एप्रिल २०१६ पासून ५ वर्षांसाठी महासंघाची नवीन कार्यकारिणी येणार आहे. त्यासाठी नाशिक येथे दि. ८ मे १६ रोजी विशेष सर्वसाधारण सभा आहे. निवडणूक प्रक्रिया ही योग्य पद्धतीने व्हावी, यासाठी निवडणूक अधिकारी व महासंघ प्रयत्नशील आहे आणि ती पूर्ण होईलच अशी आशा आहे. आपणा सर्वांना, आपल्या कुटुंबीयांना हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा आणि पुढील वर्षाचा प्रत्येक दिवस आनंदाचा, सुखसमृद्धीचा जावो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!





# 'बकुळफुले'

डॉ. श्रीकृष्ण जोशी
रत्नागिरी



**सगळीकडे पाणी आहे पण पाणी पिण्याची इच्छाच होत नाही. आजूबाजूला सर्वत्र ज्ञानभांडाराचे खजिने आहेत. पण त्याकडे डोळे उघडून सृष्टीतले सजीव- निर्जीव घटक, निसर्ग, कीटक, प्राणी, पक्षी, पाऊस, वारा एक ना दोन, अनेक घटक आपल्याला काहीतरी देत असतात. शिकवत असतात. पण त्यांचं शिकवणं आपल्या इच्छाशक्तीच्या अभावानं मेंदूपर्यंत पोहोचत नाही.**

माऊली ज्ञानेश्वरांनी, ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायात एक अप्रतिम दृष्टांत सांगितलेला आहे.

का लवणाची कुंजरी । सूदलिया लवणसागरी ।
होयेचि ना माघारी । परती जैसी ।।

मिठापासून बनवलेली हत्तीण फारच मळली म्हणून समुद्रात धुण्यासाठी उभी केली आणि थोड्या वेळाने तिला किनाऱ्यावर आणायला म्हणून समुद्रात गेलो तर ती हत्तीण तिथं होती कुठं? ती समुद्राच्या पाण्यात विरघळून गेली होती. समुद्राशी एकरूप झाली होती. मूळ रूपात ती परत गेली होती.

माऊलींनी हा दृष्टांत, ज्ञानाच्या सामर्थ्यानं संपन्न होणाऱ्या माणसांसाठी सांगितला आहे. एकदा मिळवलेलं ज्ञान हरवत नाही, नाहीसं होत नाही. ते विविध रूपात, विविध विषयांत, आकारात, प्रकारात समाविष्ट झालेलं असतं. ते वेगळं काढायचा प्रयत्न केला तरी मूळ रूपातील ज्ञान शिल्लक राहतंच हे ओळखणं मात्र गरजेचं असतं.

जगातली कोणतीही गोष्ट नष्ट होत नाही. ती रूपांतरित होते, हा विज्ञानातला सिद्धान्त माऊलींनी ज्ञानाच्या स्वरूपासाठी कित्येक वर्षे अगोदर वापरला आहे. ज्ञानेश्वरी ही विज्ञानेश्वरी आहे हे अशा अर्थानं लक्षात घ्यावं लागतं.

माऊलींनी कुंजरी आणि लवणसागर हे दोन शब्दप्रयोग अत्यंत समर्पक म्हणून वापरले आहेत. कुंजरी म्हणजे हत्तीण. पृथ्वीवर आता अस्तित्वात असणाऱ्या महाकाय प्राण्यातील सर्वांत महाकाय प्राणी. ज्ञानाचं विशाल रूप सांगण्यासाठी त्याचा उपयोग त्यांनी केला आहे. लवणकुंजरी हा नवा शब्द त्यातून तयार करून ज्ञानाचं रूपांतर होऊ शकतं हा एक संकेतही त्यातून त्यांनी दिला आहे आणि लवणकुंजरी विरघळते कशात, तर लवणसागरात. सागरात लवण म्हणजे मीठ असतं, हे गृहीत असूनही लवणसागरी हा पुन्हा नवा शब्द माऊली योजतात. तो योजतात त्याचं कारण समृद्ध, संपृक्त आणि संपन्न असं ज्ञानाचं अतिविशाल स्वरूप त्यांना सूचित करावयाचं आहे. आणि या सगळ्या पार्श्वभूमीवर माणूस कुठं आहे, हेही त्यांना शोधायचं आहे.

आपल्या आजूबाजूला असणाऱ्या ज्ञानसागरात माणूस पोहतो का, असा विचार केला तर काय दिसतं?

ते चित्र फार सुखावह नाही.

सगळीकडे पाणी आहे पण पाणी पिण्याची इच्छाच होत नाही. आजूबाजुला सर्वत्र ज्ञानभांडाराचे खजिने आहेत. पण त्याकडे डोळे उघडून सृष्टीतले सजीव- निर्जीव



## इच्छाशक्ती

घटक, निसर्ग, कीटक, प्राणी, पक्षी, पाऊस, वारा एक ना दोन, अनेक घटक आपल्याला काहीतरी देत असतात. शिकवत असतात. पण त्यांचं शिकवणं आपल्या इच्छाशक्तीच्या अभावानं मेंदूपर्यंत पोहोचत नाही.

छांदोग्योपनिषदातील सत्यकाम जाबाल या कथेत सत्यकामाचे गुरू जेव्हा त्याला सत्याचा शोध घ्यायला सांगतात. पर्यायानं खऱ्या ज्ञानाचा शोध घ्यायला सांगतात तेव्हा तो खऱ्या ज्ञानाच्या शोधात बाहेर पडतो. आणि एका तपानंतर तो जेव्हा परत येतो तेव्हा तोच गुरूंना सांगतो- मला वाऱ्याने, अग्नीने, पाण्याने, पशुपक्षांनी खूप ज्ञान दिलं आहे. सत्यकामाला निसर्गातून मिळालेलं हे ज्ञान म्हणजे त्याच्या इच्छाशक्तीनं मिळवलेलं ज्ञान आहे. उपनिषदातील ही कथा ज्ञानोत्सुकांना प्रेरणादायक आहे.

वाहणारा वारा जेव्हा वेळूच्या बनातून जातो तेव्हा संगीत निर्माण होतं. पंचमाची

पान क्र. ५ वर

पान क्र. ४ वरून

# 'बकुळफुले'

आठवण करून देणारी शीळ वेळूच्या बनातून ऐकू येते. खळाळणारा ओढा, किनाऱ्यावरची गाज, तांडवनृत्याची आठवण करून देणारे वादळ, जीवनातील क्षुद्रत्व जाणवून देणारा भूकंप, कोणालाही हाती धरता येणार नाही अशी आकाशातील वीज, पक्षी, प्राणी यांचे विविध आवाज या सगळ्यातून ज्ञान नक्कीच मिळतं. हवामान बदलाची चाहूल पशुपक्ष्यांना आधी लागते. पृथ्वीवर घडणाऱ्या घटनांचा वेध प्राण्यांना आधी लागतो. हे सर्व आजूबाजूला घडत असताना माणूस मात्र इच्छाशक्तीच्या अभावानं त्याचा अन्वयार्थ लावायला कमी पडतो.

माऊलींनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे अग्नीची ज्वाळा पेटून हवेत विरल्यावर परत आणता येत नाही. ती जोपर्यंत प्रज्वलित आहे तोपर्यंत कार्यभाग साधावा लागतो. मूळ स्वरूपातलं ज्ञान, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे भान या सगळ्याचा एक समन्वय साधावा लागतो. त्यासाठी इच्छाशक्ती जागी व्हावी लागते. मग मूळ स्वरूपातलं असो वा अन्य स्वरूपातलं असो ज्ञान फार दूर नसतं; नाही का?

***

## काव्यपुष्पांजली

## पन्नाशीचा पाचोळा

आज विजयचा पन्नासावा वाढदिवस! आपण पन्नाशी गाठतो तेव्हा आपले 'वय' उतरंडीला लागल्याची जाणीव होते. पण हे दुसऱ्यांना कळू नये अशी आपली इच्छा असते. विशेषतः आपल्या बायकोला तर मुळीच कळू नये, असा प्रयत्न बरेच जण करीत असावेत! पन्नाशीचा पाचोळा वा कवितेत वर्णन केल्यासारखे! तेव्हा हा पन्नाशीचा पाचोळा

आता डोईवर । केस लागले पिकाया।।
एक बरे तिला कमी । लागले दिसाया।।१।।
थरथरे माझा हात । काम करतांना ।
तिला वाटे धांदलीचा । स्वभाव तो जुना ।।२।।
गाणे तिचे लागे । कानी किती गोड।
सैल झाली माझी । हिअरिंग एड ।।३।।
अजूनही कशी मला। दिसे ती सुंदर ।
काय फसवितो मला। चष्म्याचा नंबर ।।४।।
जवळ जाऊनी । म्हणतो मी 'हनी' ।
मान झटकूनी म्हणे । 'तुम्ही कुचकामी'।।५।।

सौ. विद्या आणि श्री. अशोक सप्रे

## लावणी साठीची

एकूणच पाश्चात्त्य देशात माणसांची वृत्ती अजून यौवनात मी असते. त्यामुळे सौंदर्य प्रसाधने आणि यौवन टिकवण्यासाठी गोळ्या यावर अमेरिकन कंपन्या संशोधन करत असतात. म्हणून सोळावं वरीस धोक्याचं तसं साठावं वरीस मोक्याचं असतं. आमच्या एका मित्राच्या साठाव्या वर्षानिमित्त आम्ही लिहिली ही लावणी...

वृद्धपणाच्या रस्त्यावरचं ।
पहिलं ठिकाण मोक्याचं ।
साठावं वरीस धोक्याचं हो ।
साठावं वरीस धोक्याचं।।धृ।।
चावरा वारा थंडीचा।
पतंग उडवी मफलरचा।
तोल सुटावा अशी वेळ ही।
धरा बोट हे नातीचं ।।१।।
केस रुपेरी झाले रे।
डोळा अंधुक दिसते रे।
सांध्यांमध्ये कळा मारती ।
खोबरं झालं झोपेचं।।२।।
ओढ लागली संगतीची ।
नेत्र भेटीच्या गमतीची।
नाही तिला हे गुपीत कळलं।
फायझरच्या त्या गोळीचं।।३।।

– सौ. विद्या आणि श्री. अशोक सप्रे

## एवढ्याशा आयुष्यात

एवढ्याशा आयुष्यात खूप काही हवं असतं
जे हवं आहे, ते कधीच मिळत नसतं
हवं असलेलं मिळालं, तरी काहीतरी कमीच असतं
म्हणूनच, आपलं मन कधी समाधानी नसतं...
एवढ्याशा आयुष्यात कधी दुःख, कधी सुख असतं
सुख-दुःखाचं चक्र कधीच कुणाला कळत नसतं
दुःख, सुख दोघांनाही आपलंच मानायचं असतं
म्हणूनच, आपलं मन कधी समाधानी नसतं...
एवढ्याशा आयुष्यात सर्वांसोबत जगायचं असतं
जगताना मात्र स्वत:ला विसरायचं नसतं
आपलं घर, आपली माणसं यांना नेहमीच खूश ठेवायचं असतं
म्हणूनच, आपलं मन कधी समाधानी नसतं...
एवढ्याशा आयुष्यात किती मिळवलं?
काय कमावलं?
किती दुःख भोगलं? आणि किती सुख अनुभवलं?
कोणासोबत राहिलो? कोणाला विसरलो?
ह्याचं काही गणित नसतं,
कारण, एकट्यालाच यायचं असतं
आणि एकट्यालाच जायचं असतं
आणि म्हणूनच छोट्या छोट्या गोष्टीत
आपल्याला समाधान मानायचं असतं...

सौ. संपदा वैभव जावडेकर
मो. ८००७४४९१५९

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027



**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# ठाणे शाखेमध्ये तिळगूळ समारंभ संपन्न

संस्थावृत

दिनांक १७ जानेवारी २०१६ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे संस्थेच्या संक्रांत संमेलनाचे इतिवृत्त सालाबादप्रमाणे या वर्षी ब्राह्मण सेवा संघ नौपाडा ठाणे येथे तिळगुळ समारंभ संपन्न झाला.

कार्यकारिणीचे सदस्य कैलासवासी श्री. विलास लघाटे यांना सुरुवातीला श्रद्धांजली वाहिली. सौ. धनश्री लेले यांचे व्याख्यान ( खर तर सहज सुंदर गप्पा ) विषय– किक्स म्हणजे किस्से कविता आणि कथा– हा समारंभाचा आकर्षण बिंदू होता. त्यांनी आपल्या भाषणात योग्य शब्द रचनेचे महत्त्व समजावून सांगितले. कविवर्य गदिमा, पाडगावकर, यशवंत देव इत्यादींच्या आयुष्यातील किस्से त्यांनी सांगितले. कमीतकमी शब्दामधून जास्तीत जास्त अर्थ व्यक्त करणारे कवी म्हणून त्यांनी संत ज्ञानेश्वर गदिमा, जावेद अख्तर, कबीर, कुसुमाग्रज, गुलझार, इंदिरा संत इत्यादी कवींचा त्यांनी आवर्जून सोदाहरण उल्लेख केला. वयाची ७५



वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिक, लग्नाला ५० वर्ष पूर्ण झालेली दांपत्य व गुणवंत विद्यार्थांचा सत्कार सौ. धनश्री लेलेंच्या हस्ते करण्यात आला. कऱ्हाडे ब्राह्मण युवा संघातर्फे दिनांक १० व ११ जानेवारी रोजी राजमाची रोहाणाचे आयोजन केले होते. निवडक फोटोचे सादरीकरण, स्लाईड–शोद्वारा सारिका प्रभुदेसाई, सचिन ताटके, सुशील तांबे व सुजित मोघे यांनी माहितीपूर्णरित्या केले. नवीन सदस्य श्री. कयाल यांनी ओरीगामिचे प्रात्यक्षिक खूप कल्पकतेने सादर करून सगळ्यांची वाहवा मिळवली. सुग्रास गूळ पोळीच्या भोजनाने समारंभाची सांगता झाली.

## पत्रप्रतिसाद

संपादक यांस,

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क' त्रैमासिक (ऑक्टोबर– डिसेंबर १५)

या मासिकांत पान नं. १४ वर भावपूर्ण श्रद्धांजलीमध्ये नटश्रेष्ट भालचंद्र पेंढारकर यांच्याबद्दल एक वाक्य असे आहे 'भालजी पेंढारकर या नावाने ते परिचित होते', परंतु ते चुकीचे आहे. भालजी पेंढारकर हे वेगळे व्यक्तिमत्त्व होते. भालचंद्र पेंढारकरांना 'अण्णा' या नावाने ओळखत होते. तेव्हा चूक निदर्शनात आणून दिल्याबद्दल क्षमस्व

**श्रीमती वैशाली के. देसाई, मुलुंड**

**ARUNDHATI KOPARKAR**
M.: 98811 57579

**AMOL KOPARKAR**
M.: 98222 95720

TASTES FOOD

you dream it
we design it

**Our Services**

- Outdoor Catering Services
- Banquet Catering
- Other Banqueting Celebrations
- Corporate & Industrial Catering Services

**SHRIPAD NANIWADEKAR**
M.: 988220 32105

**SANJAY NANIWADEKAR**
M.: 98226 76293

।। श्री ।।
नानिवडेकर बंधू यांचे
वरद
केटरर्स

**Our Services**
a. Traditional Catering
b. Other Traditional Fuctions
c. Marriage Halls Catering Services

**Regd. Office**
104, Mayuresh Apt.
Mayur Colony, Kothrud,
Pune - 411038.

# मकरसंक्रांत उत्सव व ज्येष्ठ ज्ञातिबांधव सत्कार कार्यक्रम

दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूरतर्फे मकर संक्रांत उत्सव आणि ज्या ज्ञातिबांधवांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत व ज्यांच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा दाम्पत्यांचा सत्कार रविवार, दिनांक २४ जानेवारी २०१६ रोजी सुभेदार स्मृती भवन (सुभेदार मंगल कार्यालय) काँग्रेसनगर नागपूर येथे पश्चिम नागपूर नागरिक संघाचे अध्यक्ष आणि ग्रंथालय भारतीचे संरक्षक श्री. बाबासाहेब देशपांडे यांचे प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर, तर विशेष अतिथी म्हणून श्री. व्ही. जी. धामणकर होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी, विशेष अतिथी व अध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. संघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर यांनी संघ समाजबांधवांसाठी राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन हे उपक्रम सातत्याने चालविण्यासाठी ज्ञातिबांधवांनी उदारहस्ते देणगी देण्याचे आवाहन केले. मुख्य अतिथी व विशेष अतिथींचा परिचय; आकाशवाणी वृत्तनिवेदिका प्रा. सौ. प्रभाताई देऊस्कर यांनी करून दिला. तत्पश्चात वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या जातिबांधवांचा व लग्नाला ५० वर्षे पूर्ण केलेल्या दाम्पत्यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींपैकी श्री. धामणकर, श्री. करकरे आणि आठल्ये यांनी देणगी दिली. या उत्सवानिमित्त आयोजिलेल्या डिश डेकोरेशन स्पर्धेतील व भावगीत स्पर्धेतील




विजेत्यांना संघाच्या अध्यक्षांनी रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. महिलांसाठी हळदीकुंकू व वाण आणि सर्वांना तिळगूळ देऊन तोंड गोड करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आकाशवाणी वृत्तनिवेदिका सौ. प्रभाताई देऊस्कर यांनी व आभारप्रदर्शन संघाचे सचिव श्री. मनिष नवाथे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. अविनाश जावडेकर, श्री. सुभेदार, श्री. ढवळे, श्री. माईणकर, सौ. नेहा लघाटे, श्री. पळसुले, श्री. बेलवलकर, श्री. पाध्ये, श्री. पंडित यांनी विशेष परिश्रम घेतले.

**– श्री. आनंद पराडकर, अध्यक्ष**


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



**With Best Compliments**

**Dynamic Engineers**

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical (Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

**व्यक्तिविशेष**

# द्विदलीय कृत्रिम झडपेचे संशोधनकर्ते
# डॉ. भगवंत कळके

युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटामध्ये डॉ. सी. वॉल्टन लिलेहाय (१९१८ ते १९९९) यांच्याबरोबर काम करीत असताना डॉ. भगवंत रा. कळके यांनी हृदयाच्या पहिल्या कृत्रिम संरचनेच्या (design) द्विदलीय झडपेचा १९६५ साली शोध लावला. ती झडप 'कळके–लिलेहाय झडप' या नावाने संबोधिली गेली आणि ती रुग्णामध्ये सर्वप्रथम १९६८ साली बसविली गेली. नंतर त्या नावाने ती रुग्णांमध्ये बसविली गेली नसली तरी डॉ. कळले यांनी शोधलेली झडप ही त्यानंतर अस्तित्वात आलेल्या सर्व द्विदलीय कृत्रिम झडपांची मूलभूत (जनक) झडप ठरली. त्यानंतर डॉ. डिमिट्री एम. निकोलॉफ (१९३४ ते २००३) यांनी डॉ. कळके यांची नावीन्यपूर्ण कल्पना वापरून व त्यात काही सुधारणा करून आधुनिक द्विदलीय कृत्रिम झडप बनविली. सध्याच्या आधुनिक युगात या पृथ्वीतलावर द्विदलीय कृत्रिम झडप ही विपुल प्रमाणात वापरात असलेली झडप आहे.

इ. स. १९६० च्या पूर्वाधांत हृदयाच्या झडपा बदलण्यास अनेक कृत्रिम झडपा उदयास आल्या; परंतु विश्वसनीय कृत्रिम झडप तयार झालेली नव्हती. त्याच सुमारास डॉ. कळके या तरुण सर्जनचे हृदयाच्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात पदार्पण झाले. या लेखातील तपशील डॉ. कळके यांच्याशी झालेल्या वैयक्तिक मुलाखतीवर आधारित आहे.

**मुंबई ते मिनिॲपोलिस**

डॉ. भगवंत राजाराम कळके यांचा जन्म भारतातील महाराष्ट्र राज्याच्या रत्नागिरी जिल्ह्यातील एका छोट्या कशेळी या गावत २४ नोव्हेंबर १९२७ या दिवशी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. भगवंत १० वर्षांचा झाला त्या सुमारास कुटुंब मुंबईत आले. शेठ गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज (व के.ई.एम. हॉस्पिटल)मधून पदवी (एम.बी.बी.एस.) संपादन केल्यानंतर शस्त्रक्रियेचे प्रत्यक्ष शिक्षण त्यांनी नायर हॉस्पिटलमध्ये घेतले. मिनेसोटा (अमेरिका) विद्यापीठातील डॉ. क्लरेन्स वॉल्टन लिलेहाय यांच्या (उघड्या) हृदयाच्या शस्त्रक्रियेच्या अभिनव आणि अग्रगण्य कामाने डॉ. कळके प्रभावित झाले होते आणि त्यांना हृदयावरील शस्त्रक्रियेबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. त्या वेळी नायर हॉस्पिटलमध्ये हृदयाची शस्त्रक्रिया बाल्यावस्थेत होती. तिथे उघड्या हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी प्रयोगशाळा होती हे डॉ. लिलेहाय यांनी त्या हॉस्पिटलला जानेवारी १९६४ मध्ये भेट दिली असता त्यांच्या लक्षांत आले. डॉ. कळके, डॉ. लिलेहाय यांना भेटले व त्यांनी ''दोन वर्षांसाठी तुमच्या बरोबर काम करण्याची संधी तुम्ही मला द्याल का?'' अशी पृच्छा केली. डॉ. लिलेहाय यांनी तशी व्यवस्था केली आणि डॉ. कळके १४ ऑक्टोबर १९६४ रोजी अमेरिकेतील मिनिॲपोलिस येथे दाखल झाले. थोड्याच दिवसांत डॉ. कळके यांना डॉ. लिलेहाय यांना ॲओर्टिक झडप स्टार– एडवर्ड्स कृत्रिम झडपेने बदलण्याच्या शस्त्रक्रियेमध्ये मदत करण्याची संधी मिळाली. ती काहीशी अवजड झडप मोठ्या प्रयत्नांनीच घातली गेली.



डॉ. कळके यांच्या त्या वेळी लक्षात आले की कमी उंचीची (Low Profile) कृत्रिम झडप विशेषतः मुलांमध्ये बसविणे जास्त सोईचे होईल. त्यांनी योजिलेली पूर्णपणे नवीन आणि पहिलीच कृत्रिम द्विदलीय झडप भारतातील त्यांच्या गावातील खाडीवर बांधलेल्या बाधाला असलेल्या झडपांसारख्या दोन दारांवर आधारित होती. जेव्हा खाडीच्या पाण्याला भरती येत असे त्या वेळी (पाण्याच्या वाढत्या दाबामुळे) ती दारे आपोआप बंद होत असत व खाडीच्या पाण्याला ओहोटी लागल्यावर दारे उघडली जाऊन आत (दाराच्या पलीकडे) आलेले व साठलेले थोडेसे पाणी निचरा होऊन परत जात असे. १९६४ सालाच्या शेवटी डॉ. कळके यांनी स्थूलमानाने काढलेली पूर्णपणे नवीन आणि पहिलीच कृत्रिम झडपेची आकृती (design) डॉ. लिलेहाय यांना दाखविली. त्यांनी त्याचा मूळ नमुना (prototype) मिनेसोटा विद्यापीठाच्या (हॉस्पिटलच्या) तळघरात असलेल्या कार्यशाळेमध्ये (workshop) करून घेण्यास संमती दिली. लवकरच डॉ. कळके, त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनेप्रमाणे बनविलेल्या कृत्रिम झडपेचा मूळ नमुना, अभिमानाने डॉ. लिलेहाय यांना दाखविण्यास घेऊन आले. तो पाहिल्यावर डॉ. लिलेहाय यांनी स्मितहास्य केले आणि म्हणाले, ''(प्रयोगशाळेत) वापरून बघा.'' मिनेसोटा विद्यापीठाच्या नियमानुसार डॉ. कळके यांनी पीएच. डी.साठी नाव नोंदविले व त्या अभिनव कल्पनेच्या द्विदलीय कृत्रिम झडपेवर डॉ. लिलेहाय यांच्या प्रयोगशाळेत प्रयोग करण्याचा संकल्प सोडला.

डॉ. कळके यांच्या कृत्रिम झडपेचे प्रयोगशाळेतील चाचणीचे प्रयोग मिनेसोटा विद्यापीठाच्या (हॉस्पिटलच्या) तळघरात असलेल्या कार्यशाळेमध्ये सुरुवातीस चार कृत्रिम झडपा प्रयोगासाठी बनविल्या गेल्या होत्या. मूळ संरचनेमध्ये (design) वर्तुळाकृती पातळ कड्यामध्ये दोन अर्धवर्तुळाकृती उघडझाप करणाऱ्या चकत्या बसविल्या होत्या. प्रयोगासाठी झडपा स्टेनलेस स्टीलच्या बनविल्या होत्या. डॉ. कळके यांनी त्या झडपा 'ॲओर्टिक' आणि 'मायट्रल' झडपांच्या जागी कुत्र्यांमध्ये बसविण्यास प्रारंभ केला. त्या बसविल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी हृदयामध्ये विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन

**पान क्र. १२ वर**

## खाद्यविविधता

### पनीर टिक्का मसाला

– निर्लेपपॅनमध्ये पाव कप दही, १ चिमूट मिरपूड, १ च. तेल, १ च., लसूणपेस्ट १/८ च. तंदूरकलर मिसळणे. त्यात तिखट, मीठ, पंजाबी मसाला, जिरा पावडर, आलेपेस्ट प्रत्येकी पाव च. मिसळणे. त्यात ७–८ सिमला मिरची पिसेस, ७–८ कांदा पिसेस, ५–६ मोठे पनीर पिसेस हलकेच मिसळून अर्धा तास ठेवणे. भाजणे व उकळी आलेल्या ग्रेव्हीत सोडणे.

ग्रेव्ही : पॅनमध्ये ३ ग्रेव्ही प्रत्येकी पाऊण कप, १ टे. स्पून बटर, १ टे. स्पून खवा, १ टे. स्पून क्रीम, पाऊण च. तिखट, पाऊण च. पंजाबी मसाला, पाऊण च. गरम मसाला, ३ च. भरून कसुरी मेथी, १ च. साखर जरुरीप्रमाणे पाणी, मीठ, कलर घालणे व उकळणे.





### व्हेज कढाई

३ कप पाणी उकळी आल्यावर १ ते सव्वा कप मिक्स भाज्या (गाजर, घेवडा, मटार, फ्लॉवर) १ चिमूट सोडा घालून किंचित कच्चट उकडणे. कोळसा तापवणे, ३ टे. स्पून तेलावर, १ चमचा लसूणपेस्ट परतणे, २ टे. स्पून बारीक चिरलेला कांदा चांगला परतणे. पाव कप बारीक चिरलेला टोमॅटो तेल दिसेपर्यंत परतणे. पाऊण कप चौकोनी चिरून सिमला मिरची, मिक्स बॉईल भाज्या व अर्धा कप उभा सुटा कांदा कच्चट परतणे. पाव च. धणेपावडर, अर्धा च. गरम मसाला, अर्धा च. पंजाबी मसाला, १ च. तिखट (आवडीनुसार), १ च. बटर घालून एखादा मि. परतणे. नंतर अर्धा कप ब्राऊन ग्रेव्ही ३ टे. स्पून, व्हाइट ग्रेव्ही पाव कप, पनीर पिसेस, मीठ २ टे. स्पून, क्रीम, चिरलेली कोथिंबीर, लाल रंग घालून हलवणे. जरुरीप्रमाणे पाणी घालून २–३ मि. उकळणे. टेस्ट करणे, वाफ देणे (स्मोक देणे) . पनीर किसून व कोथिंबीर चिरून घालणे.

## 'आयसीएआय'च्या अध्यक्षपदी धामणकर



पुणे : सनदी लेखापाल (सीए) रेखा धामणकर यांची इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. शाखेच्या ५५ वर्षांच्या इतिहासात धामणकर या शाखेच्या अध्यक्षपदी निवड होणाऱ्या पहिल्या महिला सीए ठरल्या आहेत.

आयसीएआयच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या (डब्ल्यूआयआरसी) पुणे शाखेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक गेल्या आठवड्यात पार पडली. या बैठकीत धामणकर यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीत उपाध्यक्षपदी सीए सचिन परकाळे, सचिवपदी सीए अभिषेक धामणे, कोषाध्यक्षपदी सीए राजेश अग्रवाल तसेच विद्यार्थी असोसिएशनचे प्रतिनिधी म्हणून चारुहास उपासनी यांची निवड झाली आहे.

धामणकर यांनी सांगितले, 'पुणे शाखेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि सीए झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाचे आणि आधुनिकतेला अनुसरून परिषद, चर्चासत्र आणि कार्यशाळा घेण्यात येतील. त्यांना सीए करण्यासाठी उत्तम दर्जाच्या आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. देशात पुणे शाखेला अग्रस्थानी ठेवण्यासाठी प्रयत्न केला जाईल.' माजी अध्यक्ष यशवंत कासार यांनी मार्गदर्शन केले.

### मानसी पेंढारकरचा सुवर्ण चौकार

पुणे : महाराष्ट्राच्या मानसी पेंढारकर हिने रविवारी (२७ मार्च २०१६) केरळ येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय शालेय ॲथलेटिक्स स्पर्धेत शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळविले. या कामगिरीसह तिने दोन वर्षांत सलग चौथे सुवर्णपदक पटकावले. केरळ येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत तिने रविवारी १४ वर्षांखालील गटात वेगवान धावपटूंचा किताब मिळविताना १२.९५ सेकंद अशी वेळ दिली. मानसीने यापूर्वी २०१४–१५ च्या वेस्ट झोन राष्ट्रीय स्पर्धा, २०१५–१६च्या मोसमात कुमार राष्ट्रीय आणि राष्ट्रीय शालेय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले होते. मानसी गेली सात वर्षे डेक्कन जिमखान्यावर अभय मळेकर यांच्याकडे सराव करत असून, परांजपे विद्यामंदिर प्रशालेत ती आठव्या इयत्तेत शिकत आहे. याच शर्यतीत महाराष्ट्राच्या चारवी पुजारी हिने ब्रॉंझपदकाची कमाई केली. शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १७ वर्षांखालील गटात रॉसलिन लुईस सुवर्ण, तर १९ वर्षांखालील गटात सिद्ध हिरे रौप्यपदकाची मानकरी ठरली.

# अभिनंदन व शुभेच्छा!


## शीतला सायनेकर यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त



सौ. शीतला गजनन सायनेकर यांना मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देण्यात येणारा २०१४ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०१५ रोजी शिक्षकदिनी माननीय राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्रीमती स्मृती जुबीन इराणी व प्रो. (डॉ.) राम शंकर कटेरीया (केंद्रीय राज्यमंत्री, उच्च शिक्षा) व श्री. उपेंद्र कुशावह (केंद्रीय राज्यमंत्री, शालेय शिक्षा व साक्षरता) यांच्या सन्माननीय उपस्थितीत विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. सौ. सायनेकर या सरकारी प्राथमिक विद्यालय, व्हाळशी, डिचोली गोवा येथे अध्यापनाचे कार्य करतात व त्यांना २०१३ चा गोवा राज्य शिक्षक पुरस्कारने सन्मानित करण्यात आले होते. देशभरातून एकूण ३५० शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.

## डॉ. अरविंद नीळकंठ नवरे 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये सलग १२ वर्षे

कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे (पुणे) माजी अध्यक्ष डॉ. अरविंद नीळकंठ नवरे यांचे नाव पत्रलेखनाबद्दल लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स (२०१६ आवृत्ती) मध्ये सलग बाराव्यांदा आले आहे. पुणे आकाशवाणीच्या पहाटे प्रसृत होणाऱ्या 'चिंतन' या कार्यक्रमावर आधारित २००१ सालापासून ते रोज त्यांच्या मुंबई मध्ये स्थायिक झालेल्या अजित या थोरल्या मुलाला पत्र पाठवीत आहेत. अशी पत्रे आता ५००० पेक्षा अधिक झाली आहेत. २००५ मध्ये लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये त्यांचे प्रथम नाव नोंदवले गेले.





## शि. द. फडणीस यांना जीवनगौरव पुरस्कार

मुंबई : व्यंग्यचित्र कलेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबईत व्यंग्यचित्रकारांचे संमेलन झाले. वसंत सरवटे आणि शि. द. फडणीस या ज्येष्ठ व्यंग्यचित्रकारांना या वेळी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ५० हजार रुपये व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दादरमधील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात १६ एप्रिलपासून दोन दिवस हे संमेलन झाले, 'चिंटू'कार चारुहास पंडित यांनी आयोजित केलेल्या या संमेलनात मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह देशोदेशीच्या व्यंग्यचित्रकारांनी मार्गदर्शन केले.

पान क्र. ९ वरून

देऊन (सेकंदाला १६ प्रमाणे) क्ष-किरणांच्या साहाय्याने फोटो काढले. हे करत असता डॉ. कळके यांना शस्त्रक्रिया विभागातील रहिवासी डॉक्टर मदत करीत असत. त्या वेळी (या हृदयाच्या शस्त्रक्रिया करताना) प्रयोगशाळेतील कुशल कारागीर हार्ट-लंग मशीन चालवीत असत.

हे करीत असताना डॉ. कळके यांच्या असे दृष्टोत्पत्तीस आले की गॉट-डॅगेट नावाची दुसरी कमी उंचीची कृत्रिम झडप अस्तित्वात आहे. डॉ. व्हिन्सेंट एल. गॉट यांनी १९५३ ते १९६० या कालावधीत डॉ. लिलेहाय यांच्या शस्त्रक्रिया विभागात निवासी डॉक्टर म्हणून काम केले होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते व्हिसकॉन्सिन विद्यापीठात स्टाफ सर्जन (शस्त्रक्रियातज्ज्ञ) म्हणून १९६० साली नेमले गेले. रोनाल्ड एल. डॅगेट, इंजिनिअर व नंतर व्हिसकॉन्सिन विद्यापीठातील प्राध्यापक यांनी बरोबर काम करून वर्तुळाकृती गोलामध्ये मध्यभागी सिलिकॉनचा थर लावलेली टेफ्लॉनची योग्य आकाराची लवचीक चकती घट्ट बसवून दोन्ही बाजू फुलपाखराच्या पंखाप्रमाणे उघडझाप करणारी झडप बनविली. गॉट-डॅगेट झडप १९६३ मध्ये प्रथम रुग्णांमध्ये बसविली गेली. ज्या ठिकाणी ती चकती घट्ट बसविलेली होती त्या ठिकाणी रक्ताच्या गुठळ्या होऊ लागल्या व त्या कारणास्तव ती झडप १९६६ साली बाजारातून परत घेण्यात आली (त्या झडपा बनविणे बंद करण्यात आले). डॉ. कळके यांनी त्यांच्या झडपेचा स्टार-एडवर्ड्स व गॉट-डॅगेट या झडपांशी प्रयोगशाळेत तुलानात्मक अभ्यास केला. डॉ. कळके यांच्या झडपेमध्ये असलेल्या दोन अर्धगोलाकृती चकत्यांची उघडझाप एकमेकावर अवलंबून नव्हती आणि त्या ६० अंशांपर्यंत उघडत असत आणि त्या उघडलेल्या दोन अर्धगोलाकृती चकत्यांच्या मधून आणि त्यांच्या बाजूने अडथळा न येता रक्तप्रवाह वाहू शकत असे. डॉ. कळके यांच्या झडपेच्या मधून रक्त वाहण्याची प्रक्रिया इतरांच्या तुलनात्मक परीक्षा केलेल्या झडपांपेक्षा श्रेष्ठ दर्जाची होती. आठ महिन्यांत एकंदर ६५ प्राण्यांवर (कुत्र्यांवर) परिशीलनात्मक अशा टेस्ट्स केल्या होत्या.

डॉ. डिमिट्री एम. निकोलॉफ यांची निवासी डॉक्टर म्हणून शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर मिनेसोटा विद्यापीठाच्या (हॉस्पिटलमध्ये) शस्त्रक्रिया विभागात शिक्षक (instructor) म्हणून १९६४ साली नेमणूक झाली असता त्यांची डॉ. कळके यांच्याशी १९६५ साली भेट झाली. जरी मूळ शोधक डॉ. कळके यांच्या झडपेमध्ये डॉ. निकोलॉफ यांचे स्वार्थी हितसंबंध निर्माण झाले होते तरी त्यांचा डॉ. कळके यांच्या (झडपेच्या) कामामध्ये कुठल्याही प्रकारे प्रत्यक्ष संबंध नव्हता; तरीही मिनेसोटा विद्यापीठाच्या शस्त्रक्रिया विभागातील एक शिक्षक असल्यामुळे डॉ. कळके यांचा पीएच.डी.चा प्रबंध वाचून त्याला मान्यता देण्याच्या समितीवर त्यांची नेमणूक झाली आणि (या समितीने) डॉ. कळके यांच्या प्रबंधाला मान्यता दिली. पीएच.डी.ची. प्राथमिक परीक्षा डॉ. कळके २४ नोव्हेंबर १९६७ रोजी उत्तीर्ण झाले. ३० मे १९६८ रोजी डॉ. कळके यांनी सर्वप्रथम शोध लावलेल्या 'कृत्रिम द्विदलीय झडपेचे रुग्णांमध्ये वापरण्याच्या योग्यतेचे मूल्यमापन' या शीर्षकाचा (अमेरिकेत) लॉस अँजेलीस, कॅलिफोर्निया येथे कृत्रिम झडपासंबंधी भरलेल्या दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये निबंध सादर केला होता. या (डॉ. कळके यांच्या) झडपेच्या कार्यक्षमतेबद्दलचे अहवाल १९६८ आणि १९६९ मध्ये प्रसिद्ध झाले होते.


# द्विदलीय कृत्रिम झडपेचे संशोधनकर्ते डॉ. भगवंत कळके

**कळके- लिलेहाय कृत्रिम झडप रुग्णामध्ये बसविण्याची पहिली क्रिया**

नोव्हेंबर १९६७ साली न्यूयॉर्कच्या कॉर्नेल मेडिकल सेंटरमध्ये डॉ. लिलेहाय यांनी (शस्त्रक्रिया विभागाची) लेविस अटेन्बरी स्टिमसन प्राध्यापक व अध्यक्ष ही नेमणूक स्वीकारली. डॉ. लिलेहाय यांनी डॉ. कळके यांना (शस्त्रक्रिया विभागात) सहभागी होण्यास बोलावून घेतले आणि डॉ. कळके ५ डिसेंबर १९६७ साली न्यूयॉर्कला येऊन दाखल झाले.

१९६८ साली हॅरी क्रोमी (सर्जिकल कंपनी, पिट्सबर्ग, पीए) यांनी (डॉ. कळके यांच्या शोधाच्या) रुग्णांमध्ये बसविण्यासाठी काही झडपा बनविल्या आणि त्यांचे 'कळके-लिलेहाय झडप' असे नामकरण केले गेले. या (झडपा) टायटेनियम धातूच्या बनविल्या होत्या आणि त्याच्या भोवती रुग्णांच्या हृदयात शिवण्यासाठी टेफ्लॉनचे आवरण होते. पहिली (कळके-लिलेहाय) कृत्रिम झडप मार्च १९६८ साली रुग्णांमध्ये अ‍ॅओटिक झडपेच्या जागी बसविण्यात आली. दुर्दैवाने रुग्णाचा दोन दिवसानंतर मृत्यू झाला. परंतु त्याचे कारण (मरणोत्तर तपासणी करूनही) समजले नाही. डॉ. लिलेहाय व डॉ. कळके यांना मोठा धक्का बसला. त्याच सुमारास डॉ. कळके यांची शैक्षणिक रजा संपत आली होती आणि त्यांच्यावर भारतात परत जाण्याचा दबाव वाढत होता. २९ जुलै १९६८ रोजी मुंबईला परतण्यासाठी डॉ. कळके निघाले. (रुग्णात वापरण्यासाठीची झडप) अधिक सूक्ष्म व आवश्यक ती सुधारणा करून पेटंट घेण्याचे विशिष्ट काम आता अमेरिकेत न्यूयॉर्कला असलेल्या डॉ. लिलेहाय यांनी करण्याचे दोघांमध्ये ठरले होते. पहिली शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे उत्साह काही अंशी कमी झाला होता. डॉ. लिलेहाय यांनी नंतर तिरप्या फिरणाऱ्या चकतीच्या कृत्रिम लिलेहाय-कॅस्टर झडपेवर लक्ष केंद्रित केले आणि १९७० मध्ये ती झडप रुग्णांमध्ये बसविली. रॉबर्ट कॅस्टर हे मिनेसोटा विद्यापीठातून परीक्षा उत्तीर्ण होऊन इंजिनिअरिंगचे पदवीधारक होते आणि पायरोलाईट कार्बन झडपेची चकती बनविण्यासाठी अतिशय योग्य आहे, अशा मताचे होते. त्यांनी जॅक सी-बोक्रोस यांच्याबरोबर काम करून त्यांच्या झडपेसाठी चकती बनविली होती. सुमारे ५५,००० लिलेहाय कॅस्टर झडपा बसविल्यानंतर त्या झडपेचे उत्पादन १९८७ साली बंद झाले.

या घटनांमुळे काही वर्षे डॉ. कळके यांच्या द्विदलीय झडपेवर सावट आले होते. तथापि, डॉ. लिलेहाय यांचे (त्यासंबंधीचे) डॉ. कळके यांच्या कामांबद्दल (स्वार्थी) हितसंबंध पुन्हा पल्लवित झाले. १९७३ मध्ये डॉ. कळके यांना डॉ. लिलेहाय (डॉ. रिचर्ड सी. लिलेहाय - डॉ. सी. वॉल्टन लिलेहाय न्यूयॉर्कला गेल्यामुळे त्यांचे बंधू डॉ. कळके यांचे ते मार्गदर्शक (guide होते.) यांच्याकडून पत्र आले की त्यांनी पीएच.डी. तीन महिन्यात येऊन पुरी करावी. डॉ. कळके यांना पीएच.डी. पुरी करण्यासाठी अमेरिकेला जावे लागणार होते. आर्थिकदृष्ट्या त्यांना ते परवडण्यासारखे नव्हते म्हणून त्यांनी पीएच. डी.साठी मिनेसोटाला जाण्याची असमर्थता डॉ. लिलेहाय यांच्याकडे व्यक्त केली. तथापि, (डॉ. कळके यांच्यासाठी) सर्वांत आश्चर्यकारक किंवा विस्मयजनक घटना अशी घडली की, मिनेसोटा विद्यापीठाच्या




**रुग्णामध्ये बसविण्याची कळके – लिलेहाय झडप, (अ) उघडी असताना, (ब) बंद असताना आणि (क) खालून पाहताना**

हृदय शस्त्रक्रिया विभागाने डॉ. कळके यांच्या पीएच.डी.च्या प्रबंधाच्या समर्थनार्थ परीक्षेचा जाण्यायेण्याचा खर्च मंजूर केला होता. मिनेसोटा विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधाचा विषय असा होता– 'पूर्णपणे नवीन आणि पहिल्याच अभिनव कल्पनेच्या कृत्रिम द्विदलीय झडपेच्या रुग्णांमध्ये वापरण्यासाठीच्या योग्यतेचे मूल्यमापन.' डॉ. कळके यांचे परीक्षक होते डॉ. लिलेहाय (डॉ. रिचर्ड सी. लिलेहाय), डॉ. निकोलॉफ आणि डॉ. जेसी ई. एडवर्ड्स– डॉ. कळके यांना पीएच.डी. २० जुलै १९७३ (मूळ लेखामध्ये चुकून एप्रिल १९७३ पडले आहे.) रोजी बहाल करण्यात आली. डॉ. निकोलॉफ यांना डॉ. कळके यांच्या कृत्रिम झडपेमध्ये स्वार्थी हितसंबंध निर्माण झाले होते. आणि त्यांनी डॉ. कळके यांच्या प्रबंधाचे समालोचन केले होते.

पायरोलाईट कार्बन हा पृथ्वीतलावर तयार केलेला अत्यंत कठीण पदार्थ आहे आणि तो अणुशक्तीच्या इंधन विभागात वापरला जातो. ब्रोक्रोस यांनी १९६४ साली डॉ. गॉट यांना कृत्रिम झडपा बनविण्यासाठी पायरोलाईट कार्बनचा उपयोग करावा, असा सल्ला दिला होता. त्यांनी असे दाखवून दिले होते की पायरोलाईट कॉर्बन हा रक्ताच्या गुठळी होण्याच्या क्रियेला तीव्र प्रतिकार करतो. पायरोलाईट कॉर्बनने कृत्रिम झडपा बनविण्यामध्ये क्रांतिकारक बदल केला आहे. १९६९ मध्ये डिबेके–सर्जिटूल कृत्रिम झडपेचा पोकळ गोलाकार भाग (ball) बोक्रोस यांनी पायरोलाईट कार्बनचा बनविला ही गोष्ट कृत्रिम झडपा बनविण्यामध्ये नवीन कलाटणी मिळाल्याचे दर्शविणारी महत्त्वपूर्ण घटना ठरली. १९७० सालापासून बऱ्याचशा एक चकती असलेल्या झडपांच्या चकत्या त्यापासून (पायरोलाईट कार्बन) बनविल्या गेल्या. नंतरच्या सर्व द्विदलीय कृत्रिम झडपा पायरोलाईट कार्बनच्या बनविल्या गेल्या. यावरून त्याच्या मजबूतपणाची आणि टिकाऊपणाची कल्पना येते.

**द्विदलीय कृत्रिम झडपांचा विकास : डॉ. कळके कृत्रिम झडपेपासून ते आधुनिक कृत्रिम झडपेपर्यंत**

१९७६ साली औद्योगिक इंजिनिअर क्रिस्टोफर पोसी (स्) आणि डॉ. निकोलॉफ व यांनी एक कृत्रिम झडप बनविण्यास सुरवात केली. डॉ. निकोलॉप व पोसी (स्) हे मॅन्युअल ए. व्हिलाफिना यांना या झडपेच्या पुढच्या प्रगतीसाठी भेटले. ४ जुलै १९७६ रोजी व्हिलाफिना यांनी सेंट ज्युड मेडिकल कंपनी स्थापिली. ही संपूर्ण झडप बोक्रॉस यांच्या पायरोलाईट कार्बनची बनवावी असे व्हिलाफिना यांचे स्पष्ट मत होते. डॉ. निकोलॉफ मिनासोटा विद्यापीठाच्या (शस्त्रक्रिया विभागात) असोसिएट प्रोफेसर असताना त्यांनी पहिली सेंट ज्युड झडप ३ ऑक्टोबर १९७७ रोजी (रुग्णामध्ये) बसविली. जरी १९७७ साली बसविलेली सेंट ज्युड झडप बाह्यतः कळके–लिलेहाय झडपेसारखीच होती तरी व्हिलाफिना यांच्या म्हणण्यानुसार ती 'डॉ. कळके यांच्या झडपेची थेट प्रतिकृती' नव्हती. विशेष लक्षणीय गोष्ट म्हणजे सेंट ज्युड झडपेच्या मूळच्या संरचनेमध्ये (design) गेल्या ३० वर्षांत कोणताही मूलभूत फरक झालेला नाही.

**यशस्वी विस्मरण की जाणीव न झालेली कीर्ती (प्रसिद्धी)**

डॉ. कळके नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये अधिष्ठात्याच्या (डीन) पदावर काम करीत होते आणि निवृत्त होईपर्यंत हृदय आणि रक्तवाहिन्याच्या शस्त्रक्रिया विभागाचे मुंबई येथील नायर हॉस्पिटलमध्ये प्रमुख होते. रुग्णांच्या चिकित्सा आणि शस्त्रक्रिया या व्यतिरिक्त डॉ. कळके यांनी संशोधन व शस्त्रक्रियेचे अध्यापनविषयक कामही चालू ठेवले होते. निवृत्तीनंतर डॉ. कळके यांनी साधी राहणी आचरली होती. त्यांनी (शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातून) गरीबांना मदत करणे व त्याद्वारा समाजसेवा करणे हे चालू ठेवले होते. ते डॉ. लिलेहाय यांना बऱ्याच वेळा भेटले आणि त्यांचा डॉ. लिलेहाय यांच्याशी नियमित पत्रव्यवहार चालू होता. बहुतेक हृदय शस्त्रक्रियातज्ज्ञांनी डॉ. कळके यांच्याबद्दल विशेष ऐकले नव्हते. शिवाय, डॉ. निकोलॉफच्या गटांतील प्रसिद्ध झालेल्या दोन मुख्य लेखात द्विदलीय कृत्रिम झडपेचे डॉ. कळके हे मूळ संशोधक आहेत याचा उल्लेख आम्हाला आढळला नाही. तथापि, डॉ. निकोलॉफ यांनी २००२ साली अशी कबुली दिली होती की, '१९६७ साली डॉ. सी. वॉल्टन लिलेहाय यांच्या प्रयोगशाळेत एका तरुणाने, डॉ. कळके यांनी पायाभूत अशी द्विदलीय कृत्रिम झडप बनविली होती. परंतु योग्य साहित्याचा अभावी ते ती झडप यशस्वीपणे बनवू शकले नाही.' २००२ साली सेंट ज्युड यांच्या कृत्रिम झडपांच्या जगाच्या बाजारपेठेतील खप ५० टक्के व त्यातून त्यांचे उत्पन्न १.६ अब्ज डॉलर्स एवढे होते. २००७ साली त्यांचे उत्पन्न ३.८ अब्ज डॉलर्स एवढे होते. दोन मिलियन (२० लाख) पेक्षा जास्त द्विदलीय कृत्रिम झडपा जगभरात बसविल्या गेल्या आहेत. द्विदलीय कृत्रिम झडपेचे पायाभूत काम करणारे पहिले संशोधक डॉ. कळके यांचा अधिकार मान्य करण्याची अत्यंत योग्य वेळ आलेली आहे, असे वाटते.

**– पंकज सक्सेना,**
**इगॉर ई. कॉस्टँटिनोव्ह, ऑस्ट्रेलिया**

# परिकथेतील राजकुमारा ऽऽ!

**ले. अविनाश ब. हळबे**





आमचे मित्र श्री. अविनाश हळबे यांचं हे तिसरं पुस्तक, म्हणजे तिसरा कथासंग्रह. पहिला 'नारायणि नमोस्तुते' २००८ साली व्हिनस प्रकाशनने प्रकाशित केला. दुसरा 'त्वमेव केवलं कर्ताऽऽसी!' २०११ साली व आता हा 'परिकथेतील राजकुमारा ऽऽ!' आरती प्रकाशनने प्रकाशित केला आहे.

या संग्रहात एकूण सात संस्कारक्षम कथा आहेत. या सर्व कथा 'एकता' व 'किशोर' मासिकात आधीच प्रसिद्ध झालेल्या आहेत.

अविनाशजींच्या सर्वच कथा अत्यंत सोप्या भाषेतील अनुभवनिष्ठ आहेत. त्यांची भाषाशैली ओघवती आहे. श्री. हळबे सश्रद्ध तर आहेतच पण विज्ञाननिष्ठही आहेत. अध्यात्माशी विज्ञानाची सांगड घालण्याची त्यांची शैली उत्तम आहे.

आस्तिक व नास्तिकतेतील संघर्ष त्यांनी पहिल्या 'क्रिया पालटे तात्काळ' या कथेतील दोन पात्रांच्या माध्यमातून फारच छान उलगडून दाखविला आहे. या कथेतून 'दासबोध' वाचून एखाद्याची वृत्ती पालटू शकते, हा विश्वास ते वाचकांच्या मनात निर्माण करतात. लहानपणी झालेले संस्कार व त्यामुळे येणारी सेवाभावी वृत्ती याचे दर्शन आपल्याला 'दासा जेवू घाल ना!' या कथेत घडते. गरिबीमुळे आपण वारकऱ्यांना जेवू घालू शकत नाही, याचे छोट्या अविला खूप वाईट वाटते. त्यासाठी तो कष्टाची कामे करतो. पौरोहित्यातून मिळणाऱ्या दक्षिणेतून घरालाही उभारी देतो. परिस्थिती सुधारताच आई वारकऱ्यांना जेवू घालते. 'स्वये देवद्वार झाडी' या कथेतून देवाकडेसुद्धा फुकट काही मागायचे नाही व कोणतेही काम करण्यास कमीपणा नसावा, हा संस्कार सहज होतो. 'ऋणानुबंध' ही या संग्रहातील दीर्घकथा आहे. प्रेमविवाहातसुद्धा कशा अडचणी येतात व शेवटी प्रेमच विजयी होते, ही कथा खरोखरच वाचकाला गुंगवून ठेवते. श्री. हळबे या कथेद्वारे मूल न होणे व मूल दत्तक घेणे या सामाजिक प्रश्नाला सहज हात घालतात. 'स्मृतीसुगंध' या कथेतून श्री हळबे मानवी जीवन व निसर्ग यांचे असलेले सहज सुंदर नाते उत्तमरीत्या उलगडून दाखवतात. 'परिकथेतील राजकुमाराऽऽ!' या शीर्षक कथेत दोन निर्मळ मनांचा मेळ आपणास दिसतो. आपल्या मनात असलेल्या सहचाऱ्याचे प्रत्यक्ष दर्शन होताच मन कसे उभारी घेते व यश प्राप्त करते, हे श्री. हळबे यांनी हळुवारपणे उलगडून दाखविले आहे. या कथेत अतिरंजकता होण्याचा धोका होता, परंतु हळबेंनी ती सीमारेषा व्यवस्थित सांभाळली आहे. 'बबनची विहीर' ही एका निरागस पण जिद्दी मुलीच्या गावासाठी केलेल्या यशस्वी श्रमाची गोष्ट आहे. ही कथा वाचताना वाचक आपले अश्रू लपवू शकत नाहीत. गावासाठी कष्ट करून ती मुलगी एक आदर्श निर्माण करते. अशा या सात कथा श्री. हळबेंनी वाचकांसमोर एखादा चित्रपट पाहावा तशा सादर केल्या आहेत. लेखक कुठेही मास्तर बनत नाहीत किंवा उपदेशात्मकही होत नाहीत, तर ते आपला जवळचा एखादा मित्र बनून आपल्याशी संवाद साधतात. हे पुस्तक एकदा वाचून समाधान होत नाही म्हणून ते विकत घेऊन संग्रही ठेवावे. तसेच एखाद्या प्रसंगी भेट म्हणून देण्यासाठीही हे पुस्तक अगदी योग्य आहे.



**– सुहास कुलकर्णी.**
७२७६०९८९२७

मनावर संयम ठेवूया म्हणतेस
स्वत:च्या मनाची साक्षही देतेस
पण त्याला एकदा विचारून तर बघ
खरच तुझ्या ते कह्यात का असते.

------------------

सांज ओलेती नभी झाली
रंग गुलाबी गाली ल्याली
आठवते का बघ तिच्या
रंगात कुणी हळवी झाली

------------------

सांज जाई रात पांघरुनी
चांद परते चांदणे घेऊनी
फिरून यावे तू स्वप्नातुनी
पुन्हा उजळव्या आठवणी
**– अल्पना कशाळकर**

# ‘शिशिर ऋतूचं गान!’

वर्षा ऋतूच्या तृप्त करणाऱ्या जलधारा पिऊन सुखावलेली, तरारून आलेली रोपे शेतात डोलू लागतात. शेतातल्या नव्या, पिवळ्या धान्याचा एक दरवळ दूरवर पसरू लागतो. नव्या धान्याचे तोरण घरादाराला दिसू लागते. सोनपिवळे धान्य वानवळा म्हणून वाटायला सुरुवात होते. दिवसा गरम ऊन, रात्री सुखद गारवा असे आल्हाददायी वातावरण निर्माण होऊन थंडीची चाहूल लागते. सुरुवातीला येणाऱ्या हेमंत ऋतूच्या प्रभातसमयी, चैतन्य, उत्साहपूर्ण वातावरण असते. दिवस लवकर मावळतो व रात्रही मोठी व्हायला लागते. अशावेळी थंडीतली गाढ झोप पूर्ण होऊन मनही ताजेतवाने होत राहते. वेळेत येणारी जाग व मस्त गुलाबी थंडीची चाहूल लागताच स्वेटर, कानटोपी, मोजे, मफलर, शाल असा सर्व जामानिमा करून मस्त फिरून येण्याचा आनंद काही वेगळाच. शीतलहरींच्या साथीने पर्वती, सिंहगडसारखी ठिकाणे चढणे व कोवळ्या उन्हाची ऊब घेत घरी येणे हे दोन्ही उत्साहवर्धकच.

दिवाळीच्या पहिल्या दिवशी पहाटे लवकर उठून (थंडीमुळे उठवत नसे) गरम पाण्याने केलेली अंघोळ ही अशीच एक अविस्मरणीय प्रभात. दिवाळीचा फराळ आणि फटाक्यांच्या पुढे, अंगाला झोंबणारा पहाटवारा जाणवतही नाही. घरादारातून तेवणाऱ्या पणत्या, आकाशकंदील जणु थंडीची शिरशिरी दूर करतात. त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत चालणारे दीपोत्सव, तुळशीविवाह यामुळे थंडीतील संध्याकाळ छान वाटते.

हळूहळू हेमंत ऋतू जाऊन शिशिराची चाहूल लागते. दत्तजयंती, नाताळ साजरे होत असताना थंडीची तीव्रताही जाणवू लागते. रात्रीच्या बोचऱ्या थंडीपासून रक्षण करण्यासाठी शेकोट्या पेटू लागतात. त्या वेळी गप्पागोष्टींनाही ऊत येतो. गावागावांतून शेकोट्यांची जी रंगत जाणवते ती मजा शहरातील मुलांना मिळत नाही. अशावेळी माझ्या लहानपणीची आठवण येते. तेव्हा उन्हं वर आली तरी आम्ही शेकोटीजवळच बसून राहायचो.


याच थंडीत शाळा, महाविद्यालयातून स्नेहसंमेलनेही रंगत असतात. कार्यक्रम बसवणे, तालीम करणे यासाठी हा मोसमही चैतन्यदायी. कार्यक्रमांनंतर मटार उसळ- पावाची मेजवानीचा आनंद तर अवर्णनीयच.

पुणेकर रसिकच नव्हे तर जगभरातील तमाम रसिकांना आनंद देणारा अभिजात रागसंगीताचा महोत्सव- सवाई गंधर्व महोत्सव थंडीत अगदी रंगतोच. पूर्वी कॉफी, वडे वगैरेंचा आनंद घेत पहाटेपर्यंत मैफलींना ऐकत स्वरब्रह्मात विलीन होण्याचा आनंद काही वेगळाच. आता फक्त रात्री १० पर्यंतच हा आनंद मिळतो.

फिरण्यासाठी, पर्यटकांसाठी आनंदाचा, सुखाचा असा हा काळ होय. दवबिंदूच्या थेंबावर चमचमणारी सूर्यकिरणे अंगावर घेत, धुक्यात हरवलेल्या निसर्गाचा शोध घेताना मन अगदी मोहरून येते. धुक्याच्या शालीत लपेटलेली गावे, शहरे, डोंगरदऱ्या धुक्याबाहेर अलगद येतात तेव्हा ते जागेपण फक्त न्याहाळायचं. गवतावरचे दवबिंदू चिमटीत पकडायचा प्रयत्न करायचा व सृष्टीशी हितगुज करत आपणही धुक्यात हरवायचं. मनातल्या आठवणी दाटून येतात व शब्द आठवतात. ‘आठवणी दाटतात, धुके जसे पसरावे.’ खरंतर थंडीतील धुके हा स्वतंत्र विषय ठरावा. निराश मनाला थंडीतले धुके उदास वाटते तर उत्साही मनाला धुक्यात हरवलेली वाटही गवसते. असे वाटते की, ‘वाट गवसली धुक्यामधली, तुझ्या माझ्या विचारातली.’

अशी नव्या उत्साहाने, नव्या आशा, नवी स्वप्ने पाहत प्रत्येक नव्या दिवसाची वाट पाहताना जुन्या वर्षाला निरोप देत रात्री १२ पर्यंत जागून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या जल्लोषात करायचे व नवीन संकल्पांचा विचार करत, नवे बेत आखत थंडीच्या कुशीत अधीन व्हायचे.

**पान क्र. १६ वर**



*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

**पान क्र. १५ वरून** नव्या वर्षाचा पहिला सण हा संक्रांत. सर्वांशी गोड बोलायचे, सौहार्दपूर्ण वागायचे हा संदेश देणारा सण. संक्रांतीच्या निमित्ताने ऊस, बोरे, गाजर यांची जोरदार आवक असते. थंडीची कमाल पातळी या वेळी जाणवते. शरीर उबदार ठेवण्यासाठी तीळ, गूळ, इ. पदार्थ आणि हरभरा, गाजर यांच्या वैविध्यपूर्ण पदार्थांमुळे नव्या ऋतुबदलाचा योग्य परिणाम साधला जातो. याचवेळी हुरडा पार्टीही रंगते व रसना तृप्त होते. गोठवणाऱ्या शिशिर ऋतूने झाडे निष्पर्ण होतात. खूप पानझड होते. पण त्याचवेळी ही कडक थंडी आंब्याचा मोहर येण्यास अनुकूल ठरते, इतरही काही पिकांसाठी आवश्यक असते.

सुख-दुःख, आशा-निराशा, ऊन-सावल्या या प्रतीकात्मक खेळाप्रमाणे पानगळ आणि नंतर येणारी नवपालवी या दोन्ही गोष्टी आहेत. अलीकडे पूर्वीसारखी थंडी नसते, दिवाळीला पूर्वीसारखी पहाट शिरशिरी जाणवत नाही. उलट गरमच वाटतं तरीही ऋतुचक्राचा बदल टिपायलाच हवा. काहीशा सुखकर व उबदार थंडीबद्दल मनातील भावफुलांनी सजवलेलं हे शिशिर ऋतूचं वर्णन करताना एक काव्यलेणं मनात साकारलं-

शिशिरऋतूचं गान गाऊया। शिशिरऋतूचं गान ।।धृ।।
कडाक्यातली गोठवणारी थंडी, फुलतो काटा, गोड शिरशिरी
वेळेवरती जाग येई परि, साखरनिद्रा छान ।।१।।
चमचम दहिवर गवतावरती, झाडेवेली गोठुन जाती
दवात भिजुनी कळ्या उमलती, कुठे दिसेना पान ।।२।।

**- डॉ. सौ. राजश्री गजानन महाजनी**
**मो. ९४०४२२७२१०**



# सातारी पेढा शॉप

संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



**मशहूर**
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
**पौष्टीक खाद्य भांडार**
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर-440012, फोन : 0712-2525704

# साठवण- आठवणींची



सध्याचे युग हे संगणकाचे युग, आहे. संगणकात मेमरी चिप असते व त्यांत प्रचंड प्रमाणात आठवणींचा साठा राहू शकतो. मानवी मेंदूतही अतिप्रचंड प्रमाणात स्मृतीचा साठा असतो. अगदी संगणकाच्या स्मृतिसाठ्याहून अनेक पटींनी अधिक. संगणक तसेच माणूस या स्मृतिसाठ्यावरच जगत असतो, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

आपण सर्व भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या काठावर उभे असतो. जमिनीत बी पेरले की त्याचे रोप होते. नंतर त्याला फांद्या फुटतात व त्याचा वृक्ष होतो. हळूहळू पानगळ होते व झाडाखाली साठून त्यातून खत निर्माण होते. या खतयुक्त मातीत झाडाचे बी पडून नवीन झाडांचा जन्म होतो. ही झाडे हवेतून नवजीवन व मुळांतून जीवनरस मिळवत असतात. माणसाचा वंशवृक्षही तसाच तयार होतो.

या एकूण प्रक्रियेतून प्रत्येकाच्या जीवनात असंख्य प्रसंग निर्माण होतात व ते स्मृतिसाठ्यांत जाऊन राहतात.

प्रत्येक व्यक्ती तसेच समाज यांच्या जीवनातील घटनांचा पुढे ग्रंथ बनतो.

या ग्रंथातूनच इतिहास, भूगोल व अन्य शास्त्रांचा जन्म होतो. म्हणून आठवणींना अनन्यसाधारण महत्त्व असते. मात्र कटु प्रसंग/ आठवणी विसरल्या व फक्त चांगल्या तेवढ्या प्रकर्षाने ध्यानात ठेवल्या, तर माणसाचे जीवन अधिक प्रसन्न व संपन्न होते.

प्रत्येकाच्या जीवनात बाल्यावस्था, युवावस्था, प्रौढावस्था व वृद्धापकाळ असतात. या प्रत्येक कालखंडात असंख्य घटना घडतात. प्रसंग येतात. तसेच जातातही. आपण जेव्हा निवांत असतो तेव्हा अशा आठवणींनी कधीकधी डोळे पाणावतात; तर कधीकधी आपण स्वतःशीच हसतो. यालाच जीवन असे म्हणतात.

जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यात घडलेल्या, आजूबाजूला समाजात दिसलेल्या प्रसंगांची आठवण लिहून काढली किंवा कथन केली तर सुंदर असे कौटुंबिक, सामाजिक, ऐतिहासिक दस्तऐवज निर्माण होतील. कदाचित ते दुसऱ्यांना मार्गदर्शकही ठरू शकतील. आपला आठवणींचा खजिना एवढा प्रचंड असतो की तो कधीच पूर्णपणे रिता होत नाही.

कोणी म्हणेल वेळ कुठाय लिहायला, आठवणी खूप आहेत पण जमतंच कुठे लिहायला? पण खरे म्हणजे या सबबी लंगड्या नाहीत का? आपल्या नित्यकर्मांना आपण वेळ देतोच ना? फक्त दैनंदिन कार्यक्रमात, करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम व्यवस्थित लावला की 'वेळ नाही' ही बाब आपोआपच गळून पडते.

लेखनकला वाटते तितकी अवघड नाही. 'हे आपल्याला जमणार नाही.' या भीतीपोटीच आपण लिहीत नाही. कोणतीही कला प्रयत्नांनी साध्य होते. मोठेमोठे वक्ते, लेखक, गायक जन्मतःच आपली कला सादर करू शकत होते थोडेच? कोणतेही ज्ञान, कला, निरीक्षण, प्रयत्न यांच्या बळावरच प्राप्त होतात. श्रीमत् भगवत् गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे की 'तत ज्ञानं, विद्धि परिप्रश्नेन सेवया.' तरी प्रत्येकालाच प्रयत्नांती लिहिता येईल, नक्कीच.

सर्वसामान्य आयुष्यमर्यादा ७० वर्षांची धरली तर त्यातील पहिली ८–१० वर्षे सोडली तरी ६० वर्षांत आपल्याकडे खूप आठवणी साठतात. त्या दुसऱ्यापर्यंत पोहोचवल्या तर द्विगुणित होतील. कदाचित त्यांतील घटना त्यांना पथदर्शक ठरतील. त्यातून काहीतरी चांगलेही घडू शकेल. म्हणून मी म्हणतो आठवणीचा खजिना लिहून काढा व मोकळा करा. त्याचं एक छोटंसं पुस्तक करा व आपल्या कॉफीटेबलवर ठेवा. ते चाळता चाळता इतरांना बहुधा आनंदच होईल व काहीतरी मार्गदर्शनही होईल कदाचित.

मी हे सर्व आपणास उपदेशपर वगैरे सांगत नाहीये. आधी केले व मग सांगितले या नात्याने आमचे एक छोटेखानी कौटुंबिक पुस्तक 'नाती व स्मृती' या शीर्षकाने केवळ खासगी वितरणासाठी प्रसिद्धही केल, आमच्या सर्व परिवार सदस्यांच्या सहभागातून! आम्हा सर्वांनाच त्यातून आनंद व नवचैतन्य प्राप्त झाले.

म्हणून मित्राने विनंती केली की लिहिते व्हा. संगणकाच्या सोईमुळे हे सहजसाध्य आहे. लिहिणार ना एखादे सचित्र पुस्तक?

**य. वि. हर्डीकर**
**मो. ९३७३५९९०८४**

# सोने चांदी युक्त भूतलावरील अमृत गोमूत्र!

अजूनसुद्धा वर्तमानपत्रात जेव्हा जेव्हा आपले वैदिक विज्ञानावर आसूड ओढणारे लेख येतात तेव्हाच आम्हा शास्त्रज्ञांना त्यांच्या अज्ञानाचे हसू तर येतेच पण कीवही येते.

आपल्या स्वतंत्र झालेल्या भारतात भारतीय वेदिक–विज्ञानावर भारतातील किती वैज्ञानिक संस्था कोणत्या विषयावर काम करत आहेत, याची काडीमात्र कल्पना नसललेल्या अशा लेखकाकडून काय वाट्टेल ते छापण्यात दुर्दैवाने अनेक वर्तमानपत्रे आघाडीवर आहेत. शेती, बांधकाम, धातुशास्त्र, रंग, सुगंधी द्रव्ये, आयुर्वेद, जनावरासाठी आरोग्यशास्त्र, पाणी शुद्धीकरण, फळे, पदार्थ, औषधे टिकवणे, जंतुनाशके, कीटकनाशके इ. सर्व क्षेत्रात आपल्या भारतीय विज्ञान क्षेत्रात जवळजवळ ७५ संशोधन संस्थांचे जुने–वेदिक विज्ञान आधुनिक विज्ञान कसोटीवर तपासून ते किती पायाभूत होते हे जगासमोर ठेवण्याचे कार्य आमच्या राष्ट्रीय रासायनिक शाळेपासून ते अनेक प्रसिद्ध विज्ञान संस्थांनी जगापुढे यशस्वीरीत्या मांडले आहे. याची कुणालाही माहिती नसावी, यासारखे दुर्दैव ते कोणते? उदा. अगदी आपले जगप्रसिद्ध वैज्ञानिक व राष्ट्रपती कै. अब्दुल कलाम हे 'यज्ञ' संकल्पनेवर काम करत होते, हे किती जणांना माहीत आहे? असो–

आज या लेखाद्वारे आपल्यापुढे गोमूत्र जे भूलोकावरील अमृत म्हणावयास हरकत नाही. याविषयी आधुनिक संशोधनाधारे माहिती देणार आहे. (एका वर्तमानपत्रात, खेदाने असे म्हणावे लागते की 'गोमूत्र' हा थट्टेचा विषय म्हणून उलेखला गेलेला नुकताच माझ्या वाचनात आला. पण मग लक्षात आले की विज्ञानाशी यांचा आयुष्यात काडीचाही संबंध आला नसणार, तर तो काय तारे तोडणार ते वाचावेच लागणार). त्याकरता हा लेखनप्रपंच.

आयुर्वेदात गोमूत्र हे अत्यंत पवित्र रसायन मानले गेले आहे. गोमूत्रामुळे हृद्यविकार, पोटांचे विकार, बद्धकोष्ठता, श्वसनरोग, कातडीचे रोग याचे निवारण करता येते, याचे स्पष्ट उल्लेख आहेत. आता भारतात जे संशोधन झाले त्यावरून त्यावेळेच्या ऋषी–मुनींचे वैज्ञानिक ज्ञान किती परिपक्व होते, हे पाहून आम्ही सर्व शास्त्रज्ञ त्यापुढे नतमस्तक होतो.

आमच्या आधुनिक संशोधनात गोमूत्रात खालील रासायनिक घटक आढळून आले ते असे :

घटक — घटकाचे कार्य

१) युरिया – जंतुनाशक
२) युरिक ॲसिड – कॅन्सर निरोधक
३) युरिकेनिज – रक्तातील गुठळ्या कमी करणे – रक्तप्रवाह वाढवणे.
४) इपिथेलियम – पेशी पुनरुज्जीवन
५) गोनाडोट्रोपिन – रक्तदाब कमी करणे
६) ॲलनटाईन – जखमा भरून येणे


कॅन्सरविरोधी तत्त्वे ज्यामुळे कॅन्सरला प्रतिबंध होतो अशी द्रव्ये

७) सोने
८) चांदी
९) एच ११ – बिटा इंडोल ॲसिटीक ॲसिड
१०) डायरेक्टाईन
११) ३– मिथेल ग्लायोक्साल
१२) नायट्रोजन – मूत्रवाहिन्या व किडनीसाठी उपयुक्त
१३) सल्फर – रक्तशुद्धी
१४) अमोनिया – पेशीरक्षण
१५) तांबे – मेद कमी करणे
१६) लोह – तांबड्या रक्तपेशी वाढवते
१७) सोडियम – ॲसिडिटी कमी करणे
१८) मँगेनिज – जंतुप्रतिबंधक
१९) फिनॉल्स – जंतुप्रतिबंधक
२०) व्हिटॅमिन अ,इ,उ,ऊए – चैतन्यस्फूर्ती
२१) लॅक्टोज – हृदयपोषक
२२) हिपूरिक ॲसिड – विषरोधक
२३) क्रिएटिन – जंतुविनाशक
२४) बेंझाईक ॲसिड – बुरशी विरोधक
२५) बेंझामाइड – श्वसन संस्थेवर, रक्तदाबावर
२६) झिंक – नखे सौंदर्य
२७) कॅल्शियम – हाडे बळकटी, दात संवर्धन
२८) फॉस्परस –

गोमूत्रावर खालील संशोधन संस्थांनी प्रचंड कामे केली आहेत.

१) Central Institute of Medicinal & Aromate Plants लखनौ (CSIR) गोमूत्र अर्कावरती ६ अमेरिकन भारतीय पेटंटस्
२) NEERI नागपूर (CSIR)
३) अमरावती सायन्स कॉलेज
४) पंतनगर युनिव्हर्सिटी
५) जिवाजी युनिर्व्हसिटी (ग्वाल्हेर)
६) IVRI Institute (इज्ञतनगर)
७) Central Drug Research Institute ( लखनौ)
८) All India Medical Seicence
९) पंचालयम् कोईमतूर
१०) गोविज्ञानसंस्था इंदूर/नागपूर
११) पं. दीनदयाळ संस्था उपाध्याय संस्थान मथूरा
१२) जूनागड अग्रिकल्चर युनिव्हर्सिटी – गुजरात
१३) शेवटी फार महत्त्वाचे व आपल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाला फार भूषणावह असे गोमूत्रावरचे काम प्रसिद्ध उद्योजक श्री. रवींद्र प्रभुदेसाई व त्यांच्या पितांबरी संशोधन संस्थेचे आहे. म्हणजे गोमूत्राचे वरील सर्व गुणधर्म ठेवून गोमूत्राचे रूपांतर कॅप्सूलमध्ये करणे होय. हे काम अत्यंत कठीण असते. पण ते यशस्वीपणे 'पितांबरी'ने पेलले आहे. त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. आपल्या प्राचीन शास्त्राला त्यांनी याद्वारे विज्ञान शिखरावर नेऊन ठेवले आहे.

**– डॉ. प्रमोद प्रभाकर मोघे**
**(निवृत्त) ज्येष्ठ शास्त्रज्ञ**
**९३२५३८००९३**



# 'आमचे अण्णा'

१० ऑगस्ट २०१५, सकाळी १० ची वेळ, सहज बातम्या बघू या म्हणून मी टी.व्ही. लावला, तर बातमी होती 'ललित कलादर्श' संस्थेचे सर्वेसर्वा श्री. भालचंद्र पेंढारकर म्हणजेच 'अण्णा' यांचे वार्धक्याने वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले, ही बातमी ऐकून सुन्न झाले व लगेच माझी धाकटी बहीण सौ. कल्पना हिला फोन करून ही दुःखद घटना सांगितली. ती ऑफिसच्या गडबडीत असल्यामुळे तिला ही बातमी कळली नव्हती. तिलाही ही बातमी ऐकून धक्का बसला.

तुसे आमचे व अण्णांचे नाते नसले तरी त्यांचे व आमचे घरोब्याचे संबंध होते, कारण माझी धाकटी बहीण सौ. कल्पना (पूर्वाश्रमीची कल्पना सुरपूर) अण्णांच्या बऱ्याच नाटकांत, बरीच वर्षे म्हणजे जवळ-जवळ १२/१३ वर्षांची असल्यापासून काम करत होती. अण्णांच्या बऱ्याच नाटकात तिने कामे केली. 'गोकुळचा चोर', 'शारदा', 'आनंदी-गोपाळ', 'सोन्याची द्वारका' इ. बऱ्याच नाटकांत अण्णांबरोबर छोट्या-मोठ्या भूमिका केलेल्या आहेत. श्री. अण्णा हे शिस्तबद्ध होते. त्यांची नाटके वेळेवर सुरू व्हायची. कधीही पुढे- मागे झालेली नाही. शिवाजी मंदिरला प्रयोग असला की, ते हमखास आमच्याकडेच उतरायचे. माझ्या वडिलांचे व त्यांचे संबंध घरोब्याचे होते, म्हणून ते हक्काने आमच्याकडे यायचे. चहा-पाणी, नाश्ता-जेवण पण ते आमच्याकडे करायचे. त्यांचा सर्वांत आवडता पदार्थ (पेय) म्हणजे कढी. अण्णा येणार म्हटल्यावर आमची आई कढी तयार ठेवत असे व ते आवडीने पीत असत. आमचे घर दादरला (पू.) स्टेशनजवळ असल्यामुळे बरेच कलाकार (अण्णांच्या नाटकातले) येत असत. आमची जागा लहान असूनसुद्धा सर्वजण हक्काने येत, कारण आमच्या आईबाबांचा स्वभाव सर्वांचे अगत्य करणे व सर्वांना आपलेसे करणे. त्यामुळे अण्णांनीसुद्धा कधी परकेपणा दाखवला नाही. खरं म्हणजे एवढा मोठा कलाकार आमच्या घरी येऊन आमच्या सर्वांशी प्रेमाने व आपलेपणाने ते वागत असत. त्यांच्या स्वभावामुळे नाटकातील सर्व कलाकरांना अण्णांबद्दल आदर होता. ते सर्वजण त्यांना मान देत असत. सर्वांना ते समानतेची वागणूक देत असत. Back stage Artiest ना पण ते आदराने वागवत असत. सर्वांची विचारपूस करणे, तसेच सर्वांचे जेवण झाले की नाही, याची चौकशी करून मगच ते जेवत असत. वक्तशीर, प्रेमळ व सज्जन असे आमचे अण्णा आता आपल्यात नाही, हे खरेच वाटत नाही. 'मरावे परि कीर्तिरूपे उरावे!' असेच अण्णांच्या बद्दल म्हणावे लागेल.

आमच्या सर्व सुरपूर बंधू-भगिनींतर्फे अण्णांना शतशः प्रणाम! हीच त्यांना श्रद्धांजली!

**- श्री. वैशाली के. देसाई**
**मुलुंड (पूर्व)**

मुलगा : ओ काका, कुल्फी कितीला आहे?
कुल्फीवाला : १०, २०, ३० रुपयांना..
मुलगा कुल्फी खातो, आणि घरी जायला निघतो.
कुल्फीवाला : अरे, पैसे दे की?



मुलगा :आमच्या घरचे म्हणत्यात खा,
प्या मजा करा..पण पैशाचा लाड नाही करायचा...!


**VIDISHA**
**ENTERPRISES**

Tally Partner

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email** : meghanathakur@yahoo.com

॥ रेशीम गांठी ॥®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९११८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन

वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे

# श्री. गंगाधर विष्णू ठेकेदार

## देई संग तुझा अम्हां गुरुवरा
### (शार्दुलविक्रीडित)


ठेकेदार यथार्थ नाव, रचितो ठेक्यात शब्दां खरे
ते आद्याक्षर संस्कृतात त्यजुनी 'केदार' हा वावरे
दुःखे ना खचतो, सदा तरुण तो, ना खिन्नता, आसवे
अन्याये चिडतो, समंजस परी साऱ्या समाजासवे
निवृत्ती-सुख भोगतो करुनिया ती शासनी चाकरी
देखे जे न रवी, तया प्रकटवी, कौशल्य त्याच्या करी
'नाना' नाम तयास लाभत मुखी स्नेही जनांच्या सदा
नाना भावछटा, प्रसन्न जणु या पुत्रावरी शारदा
गद्यातीलहि दावि पद्यमयता आकाशवाणीवरी
तैसी मंजुल गायनी बहरली संगीतिका माधुरी
हिंदी, संस्कृत, इंग्रजीतही तशी चौफेर त्याची मती
पद्माच्या स्फुट बंदिशीसह महाकाव्याचिया संगती
गांधी-जीवन संस्कृतात कथिले ग्रंथी 'महात्मायनी'
क्रांती रक्तविहीन शक्य जगती, शांती अहिंसेतुनी
'गाथा' संस्कृत दीर्घकाव्य रचिले 'स्वातंत्र्यवीरां'वरी
क्रांतीकारक जन्मठेप पचवी, हिंदुत्व जागे करी
त्यांचा संस्कृत काव्यसंग्रह तसा 'गीर्वाणगीतानि' हा
योजी ती श्रुतिरम्य सर्व यमके, वैशिष्ट्ये तेथे पहा
'माला श्रीशिवराजगीत'मय ती आदर्श राजा-कथा
शौर्ये जो मिळवी स्वराज्य, मिटवी हिंदू प्रजेच्या व्यथा
काव्या 'मोहर' यौवनात फुलला, आम्रात ये माधुरी
आता अर्पण 'भावदर्पण' करी, पाहावया अंतरी
प्रासांनी यमकेहि, नादमयता सर्वत्र आणी भरा
छंदोबद्ध करी सदैव रचना, हा छंद 'गंगाधरा'
उत्प्रेक्षा, उपमा, अपन्हुति, ध्वनी, नाना अलंकार ते
वाचेचा परतत्त्व-स्पर्श कळुनी संतोषती जाणते
ईशा आळवितो, कलेत रमतो, गूढात डोकावतो
वीरांच्या किति ऐतिहासिक कथा साकारीतो, वानितो
मातेच्या मृदुभावना निरखितो, शब्दात रेखाटतो
पृथ्वी, चंद्र, निसर्ग, वृक्ष, अशनी, पक्षांसवे बोलतो
प्रेमी, गायक, भक्त , वैद्य, गणिका, नृत्यांगना, बालके
शब्दे मात्र सजीव रूप मिळता होती किती बोलके?
आर्या, शायरि, हायकू, गजल वा ती स्रग्धरा, मालिनी
पोवाडा, फटका, अभंग, रसना, ओवी तशी लावणी
ऐशा या बहुढंगि, रंगि कवनीं लालित्य ते आगळे
दावी संत नि पंत तंत कविचे नानापरी मासले
धर्माच्या परिघी वहात कवनी हिंदुत्वनिष्ठा खरी
चाखावे रसिकी इथे नवरसां संतोषुनी अंतरी
देई संग तुझा अम्हां गुरुवरा, ना रुष्ट होई कदा
दीर्घायू, सुख, संपदा, बल तुम्हा हेमंत इच्छी सदा!

**– हेमंत श्रीपाद कारखानीस, पुणे.**

## व्यक्तिपरिचय

नाव : श्री. गंगाधर विष्णू ठेकेदार जन्मतारीख : ९ जुलै १९१६ मृत्यू दि. २९.१.१४

शिक्षण : हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूरमधून १९३३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. संस्कृत विषयात विशेष योग्यता प्राप्त.



नोकरी : कृषी विभागात शासकीय सेवा १९७४ पर्यंत केली.

इतर माहिती : कौटुंबिक परिवार पाच पुत्रांचा. पतवंडांपर्यंत विस्तार पाहिला. पाचही मुलांना घर बांधता यावे असे पाच भूखंड घेऊन दिले. फेब्रुवारी १९५८ मध्ये सोलापूर येथे महाराष्ट्र कवी संमेलन भरले होते त्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. बा. भ. बोरकर होते. तेव्हा कार्याध्यक्ष म्हणून काम केले.

सामाजिक, धार्मिक संस्थांशी संबंध. महाराष्ट्र ब्राह्मण सभेने १९९२ मध्ये आणि तपोधाम वारजे या संस्थेने १९९९ मध्ये शंकराचार्यांच्या हस्ते सत्कार केला.

शासनाच्या कृषि विभागात अधीक्षक म्हणून ज्यांनी नोकरी केली आहे, अशा व्यक्तीने 'कवी केदार' या नावाने संस्कृतमध्ये महाकाव्ये लिहावीत व ख्यातनाम व्हावे, ही लक्षणीय झेप नोंद घ्यावी अशी वाटल्यामुळे संस्कृतमधील दर्दी असणाऱ्या श्री. अवधूत हर्डीकर फाउंडेशन पुणे तर्फे २००३ साली सत्कार झाला. शारदा ज्ञानपीठम्, पुण्याचे महापौर व पुण्यातील अनेक मान्यवर संस्थांच्या सहमतीने २००४ साली ऋषिपंचमीचे दिवशी ऋषितुल्य व्यक्ती म्हणून सन्मानित करण्यात आले व मानपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले. १५ ऑगस्ट २००८ या दिवशी पुण्याच्या महापौरांनी नानांचा सार्वजनिक सत्कार करून महापालिकेतर्फे मानचिन्ह प्रदान केले.

तीर्थक्षेत्रे आणि संतस्थाने अशा संस्थांना दाने दिली. गुजरात भूकंप आणि ओरिसातील वादळ अशा राष्ट्रीय आपत्कालीन निधीस सहाय्य केले. भारतीय कुष्ठ निवारक संघ, जिल्हा सैनिक कल्याण निधी, पेन्शनर्स असोसिएशन, ज्येष्ठ नागरिक संघ अशा सामाजिक संस्थांना देणग्या असा एकूण दानधर्म एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा रुपयांच्या वर केला.

प्रकाशने : संस्कृत भाषेतील खालील ४ शासन पुरस्कृत उत्तम पुस्तके :- १. महात्मायनम् (गांधी चरित्र) १८६९ श्लोक, १९९१ साली प्रसिद्ध., २. स्वातंत्र्यवीर गाथा (सावरकर चरित्र) २००० श्लोक, १९९२ साली प्रसिद्ध., ३. गीर्वाणगीतानि - स्फुट काव्यसंग्रह ६४ कविता १९९६ साली प्रसिद्ध., ४. नेताजी सुभाष चरितम् : २००४ साली प्रसिद्ध.

मराठी भाषेतील १. मोहर काव्यसंग्रह १९४१ साली प्रसिद्ध. २. शिवराज गीतमाला ५२ गाण्यात शिवचरित्र १९९६ साली प्रसिद्ध. शासन पुरस्कृत. ३. भावदर्पण ९६ कवितांचा १४४ पानी संग्रह १९९९ साली प्रसिद्ध. या कवितासंग्रहाची प्रस्तावना कवी गिरीश यांची होती.

महाराष्ट्र शासनाच्या **पान क्र. २५ वर**

**पान क्र. २४ वरून**

शिक्षण विभागाच्या निवडक पुस्तकांच्या यादीत ५ पुस्तकांचा समावेश आहे.

पुणे आकाशवाणीवर गीर्वाण भारती या कार्यक्रमात संस्कृत कवितांचे सटीक वाचन. मुंबई आकाशवाणीवर 'आसिन्धु सागरान्तम् प्रियभारतं मदीयम्' हे संस्कृत गीत अद्यापही अधूनमधून वाजविण्यात येत होते. 'इंडियन संस्कृत स्कॉलर्स ऑफ ट्वेंटीएथ सेंचुरी' या बंगलोर विद्यापीठाचे डॉ. रंगनाथ यांनी केलेल्या संकलनात 'कवि केदार' या नावाने समावेश.

अभंगातील 'तुका म्हणे प्रमाणे' प्रत्येक स्फुट कवितेच्या शेवटच्या ओळीत 'केदार' डोकावतो. संस्कृत श्लोकामध्येच नव्हे तर गीत काव्यातसुद्धा आद्य शंकराचार्य वगळता इतरत्र पादान्त्य यमक बहुधा आढळून येत नाही. तथापि केदारांच्या सर्वच्या सर्व स्फुट कवितात मात्र असे यमक आवर्जून साधलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर महात्म्यायनम् आणि स्वातंत्र्यवीर गाथा या महाकाव्यातसुद्धा एकही श्लोक निर्यमक नाही, हेही एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

त्यांच्या या महाकाव्याच्या प्रती काशी ते मदुरा आणि द्वारका ते कोलकाता अशा भारतीय शंभर विद्यापीठे आणि संस्कृत अध्यासन संस्थांना पाठविण्यात आल्या आणि त्यांचे मूल्य राष्ट्रीय संस्कृत संस्थान दिल्ली यांनी कवीला दिले.

पुणे आकाशवाणीच्या 'गीर्वाण भारती' या कार्यक्रमात कवितावाचन १९८१ ते १९९४ दरम्यान वेळोवेळी केले. स्फुट संस्कृत कविता पुणे येथील शारदा, अहमदनगरचे गुंजारव, मुंबईचे संविद, दिल्लीचे 'संस्कृत प्रतिभा' विश्वसंस्कृतम् इत्यादी नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या आहेत.

आपल्या दीर्घायुष्याचे श्रेय ते सद्गुरू गुळवणी महाराजांना देतात. त्यांच्या कुंडलिनी जागृती दीक्षेमुळे चौतीस वर्षे दररोज पहाटे एक तास ध्यानाच्या बैठकीत प्राणायाम केवल कुंभक होता. मद्यमांसविरहित आहार निरोगीपणास उपयुक्त. त्यातून वयाच्या पंचाहत्तरीनंतर त्यांनी माध्यान्हीची एकभुक्तता पाळली होती.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचा जागतिक महिलादिनाचा समारंभ

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचा जागतिक महिलादिनाचा समारंभ शनिवार दिनांक १२ मार्च २०१६ रोजी चन्द्रेश्वर हॉल, गिरगाव मुंबई येथे संपन्न झाला. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हेमांगीताई ढवळे तसेच डॉ. कल्पनाताई वायंगणकर, पोलिस निरीक्षिका क्षीरसागर व पो. नि. अश्विनी पाटील उपस्थित होत्या. अतिथींच्या शुभहस्ते श्री. गणेशपूजन व दीपप्रज्वलनाने समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. समारंभाला १५० महिलाभगिनी व संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. भाग्यश्री सरपोतदार यांनी केले. जागतिक महिलादिनाचा इतिहास व परिचारिकांना देण्यात येत असलेल्या सेवा प्रतिष्ठा सन्मानाचे सुरेख विवेचन त्यांनी आपल्या सूत्रसंचालनात केले. संघाच्या कार्यकारी सदस्या सौ. अदिती तांबे यांनी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या उपक्रमांची व कार्याची माहिती उपस्थितानां करून दिली.

प्रमुख अतिथी डॉ. हेमांगीताई ढवळे यांच्या कार्याची ओळख सौ. अंजली आंबर्डेकर यांनी करून दिल्यावर संघातर्फे त्यांचा सन्मान श्रीमती शुभांगी टेंबे यांच्या हस्ते करण्यात आला. इतर उपस्थित अतिथींची ओळख सौ. अलका डोंगरे व सौ. वृषाली तळेकर यांनी करून दिली. संघाच्या वतीने त्यांचा गौरव सौ. रंजना टिकेकर व सौ. वृषाली पित्रे व सौ. अंजली आंबर्डेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

दरवर्षी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या तर्फे जागतिक महिलादिना निमित्त सेवा प्रतिष्ठा सन्मानाने समाजातील विविध सेवाक्षेत्रातील महिलांना सन्मानित करण्यात येत असते. यावर्षी सरकारी तसेच महापालिका रुग्णालयात रुग्णसेवा करणाऱ्या ३२ परिचारिकांना सेवा प्रतिष्ठा सन्मानाने, प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सन्मानित परिचारिकांची ओळख संघाच्या महिला मंडळाच्या सदस्या सौ. अंजली धोपेश्वरकर, सौ. अंजली पंडित, सौ. नेहा पोखरणकर तसेच सौ. गौरी हर्डीकर यांनी करून दिली. सन्मानचिन्ह वाटपाचे आयोजन रसिका टेंबे यांनी केले होते.

दरवर्षी ८ मार्च जवळ आला कि दूरदर्शन, सर्व वर्तमानपत्रे आणि सर्वच कार्यक्रमांतून महिलांचा उदो उदो करण्यात येतो. मात्र वर्षांतील इतर दिवशी त्यांच्या समस्यांकडे पाहिजे तितके लक्ष दिले जात नसल्याची खंत सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणात केली. शहरात महिला थोडी तरी सुरक्षित असते पण ग्रामीण भागातील महिलांची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याची जाणीव डॉ. हेमांगीताई यांनी करून दिली. अंधश्रद्धा, अशिक्षितपणा व गरिबी यामुळे समाजात स्त्रियांवर अन्याय होत असतात. आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरुद्ध स्त्रीने समाजाला जागृत करणे ही काळाची गरज असल्याची जाणीव त्यांनी उपस्थितांना करून दिली. पुरुषवर्गाने स्त्रियांच्या समस्यांना समजून घेऊन त्यांच्या स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. पोलिस निरीक्षिका क्षीरसागर तसेच पो. नि. अश्विनी पाटील यांनी स्त्रीच्या सुरक्षिततेसाठी पोलिस दल घेत असलेल्या कार्याची व योजनांची माहिती दिली.

परिचारिका हॉस्पिटल मध्ये तसेच समाजात जाता येता लोकांच्या कशा उपयोगी पडतात, लोकल ट्रेन मध्ये त्यांनी मदत केलेल्या प्रसुतीचा किस्सा ही एका परिचारिकेने कथन केला. काही परिचारिकांनी आम्हां भगिनींचे कार्य हे केवळ सुश्रुषा किंवा औषधे देण्यापुरतेच मर्यादित नसते, तर रुग्णाला आणि त्याच्या कुटुंबियांना मानसिक आधार देण्याचे महत्वाचे कार्य आम्ही करत असतो. रुग्ण बरा व्हावा व त्याच्या कुटुंबियांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा असे व्रत आम्ही या सेवेत येताना घेतलेले असते. व स्वीकारलेल्या व्रताचे आनंदाने आणि प्रामाणिकपणे आम्ही पालन करीत असतो. याची जाणीव त्यांनी उपस्थितांना सन्मानाला उत्तर देताना करून दिली. कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सेवा प्रतिष्ठा सन्मानाला परिचारिकांची निवड केल्याबद्दल संघ कार्यकारिणीचे आभार मानले

समारंभाच्या शेवटी सौ.भाग्यश्री सरपोतदार यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. अल्पोपहाराची व्यवस्था सांभाळणाऱ्या सौ. अमृता बहुतुले आणि कार्यकारिणीच्या महिला मंडळाच्या सदस्या सौ, पूर्वा सप्रे यांनी केलेल्या सुग्रास अल्पोपहाराचा आस्वाद घेत समारंभाची सांगता करण्यात आली.

# मधुमेहविषयक संशोधनासाठी हर्डीकर दाम्पत्याची निवड

पुणे : मधुमेहावर नियंत्रण मिळविण्याचे आव्हान जगभरातील संशोधकांसमोर आहे. या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियातील सरकार आणि तेथील संस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावर मधुमेहविषयक संशोधनासाठी महाराष्ट्रातील डॉ. आनंदवर्धन आणि डॉ. मुग्धा हर्डीकर या दाम्पत्याची निवड केली आहे.

ऑस्ट्रेलियन सरकारतर्फे तरुण मधुमेहींवरील संशोधनासाठी 'जे.डी. आर.एफ.'तर्फे डॉ. आनंदवर्धन यांना निधी मिळाला आहे. तर ऑस्ट्रेलियन डायबेटिस सोसायटीतर्फे दरवर्षी फक्त एका तरुण संशोधकाला देण्यात येणारी 'स्कीप' मार्टिन अली करिअर फेलोशिप' डॉ. मुग्धा यांना जाहीर झाली आहे.

प्रत्येक पेशीमध्ये 'आरएनए' असते आणि स्वादुपिंडाच्या पेशींमधील या आम्लाद्वारे इन्शुलिनचे उत्पादन नियंत्रित होत असते. 'आरएनए'मध्ये होणाऱ्या बदलातून तरुण वयातील मधुमेहाचा अंदाज बांधणे, या विषयावर डॉ. आनंदवर्धन संशोधन करणार आहेत. या संशोधनासाठी त्यांना पुढील पाच वर्षांसाठी सुमारे ५ कोटी रुपयांची (१० लाख ऑस्ट्रेलियन डॉलर्स) शिष्यवृत्ती मिळाली आहे. डॉ. आनंदवर्धन हे पुणे विद्यापीठातून पीएच. डी. मिळवून अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया विद्यापीठात संशोधनासाठी गेले. त्यानंतर ते पुढील संशोधनासाठी ऑस्ट्रेलियात दाखल झाले. सध्या डॉ. आनंदवर्धन हे मेलबर्न आणि सिडनी येथील विद्यापीठांत संशोधन करत आहेत.

साताऱ्यातील शिरवळ (ता. खंडाळा) येथील डॉ. विनय जोगळेकर यांची कन्या असलेल्या डॉ. मुग्धा यांनी दहावीच्या परीक्षेत अव्वल येऊनही वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी असा सर्वसामान्य राजमार्ग न निवडता बेसिक सायन्सेसला (स्टीम सेल) जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी 'जेनेटिक्स'मध्ये पुणे विद्यापीठातून पीएच. डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यापुढील संशोधनासाठी ऑस्ट्रेलियात गेल्या. मेलबर्न आणि त्यानंतर सिडनी विद्यापीठात त्या संशोधन करत आहेत. 'जनुकीय मार्कर्स'ची नोंद घेऊन मधुमेहामध्ये होत असलेल्या रक्तवाहिन्यांच्या बिघाडाचे निदान या विषयावर त्या संशोधन करणार असून, त्यांना ४० लाख रुपयांची (८५ हजार ऑस्ट्रेलियन डॉलर्स) फेलोशिप मिळाली आहे. या संशोधनावर आधारित डॉ. मुग्धा यांचा शोधनिबंध सोसायटीच्या २०१७ मध्ये होणाऱ्या परिषदेत सादर केला जाईल.

**– डॉ. मुग्धा आणि आनंदवर्धन हर्डीकर**


**फणसळकर कोंकण काजू**



कोकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

उत्पादक :

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१


# ऋणानुबंध ही यशाची शिडी

**प्रेरणादायी**

एक मुलगा त्याच्या वडिलांना विचारतो, ''बाबा, 'यशस्वी जीवन' काय आहे?''

वडिलांनी पतंग घेतला आणि त्याला बाहेर घेऊन गेले. नदीवरील मोकळ्या हवेत वडील पतंग उडवताना मुलगा एकाग्रतेने पाहत होता...

थोडा वेळ झाल्यानंतर मुलगा म्हणाला, ''बाबा, या धाग्यामुळे हा पतंग आणखी वर जात नाहीये. आपण हा दोरा तोडू यात का? मग हा पतंग आणखी वर जाईल...''

वडिलांनी मुलाकडे पाहिले आणि पतंगाची दोरी तोडून टाकली. नंतर पतंग आणखी वर गेला. मग वाऱ्याने भरकटला आणि दूर जाऊन कुठेतरी पडला. मुलगा खिन्न झाला.

'बाळा, जीवनात आपण ज्या उंचीवर असतो. तेव्हा आपल्याला कायम वाटत राहते, की काही गोष्टी आपल्याला आणखी वर जाऊ देत नाहीत. जसे, घर, कुटंब, शिस्त, पालक, शिक्षक आदी. आणखी उंची गाठता यावी म्हणून आपण त्यांच्यापासून स्वतंत्र होऊ इच्छित असतो...

'पण, सत्य हे आहे की हेच बंध, धागे असतात, जे आपल्याला एका उंचीवर नेतात आणि त्या उंचीवर अढळ राहण्यासाठी मदत करतात. हे बंध तोडून टाकले, तर आपण आहे त्यापेक्षा अधिक उंचीवर जाऊ; पण नंतर आपले तेच होईल, जे धागा तोडल्यानंतर पतंगाचे झाले... जीवनात तुम्हाला प्रगती, प्रतिष्ठा, यश साधायचे असेल, तर आपल्याला साथ देणारे ऋणानुबंध तोडू नये, धागा आणि पतंगांच्या संतुलनातून मिळालेल्या उंचीलाच सफल जीवन म्हणतात.'

# सत्यकथा अघोरी तांडव, गणपती मूर्तीच्या थैमानाचे!

कथेची सुरुवात करण्याअगोदर अघोरी पंथाविषयी आपल्याला महिती असणे अत्यावश्यक आहे.

अघोरी विद्या ही एक तंत्रमंत्रातील हिंसक, विध्वंसक पद्धतीची विद्या मानली जाते. ज्याला इंग्लिशमध्ये 'ब्लॅक मॅजिक' असे म्हटले जाते.

इतिहासानुसार १४व्या शतकाच्या आसपास हिंदू धर्मातील कापालिक वंशातील शिव भैरवनाथ पूजक या विद्येची साधना करत असल्याचे आढळून आले आहे. त्यातील वर्णनानुसार हे लोक ही विद्या प्राप्त करण्यासाठी अघोर उपाययोजना करीत. स्मशानातच मुक्काम, स्वतःला प्रेतांच्या सहवासात ठेवणे, दारू, अफू, गांजा यांचे सेवन करून प्रेताच्या माध्यमातून भूतेखेते यांचे सहाय्यातून माणसाचे अनिष्ट कसे करता येईल याचे तंत्र मिळवणे व त्याचा वापर करणे, हे त्यांचे कर्तृत्व असे. सामान्य माणसापासून ते राजेमहाराजे आपल्या विरोधकांचे अहित करण्यासाठी, त्यांचे जीवन क्रूरपणे संपविण्यासाठी अशा माणसांचे सहाय्य घेत.

आजच्या काळातसुद्धा असे प्रकार चालतात, यावर आपण अंधविश्वास ठेवत नाही. पण अशा गोष्टी जेव्हा आपल्या नात्यात कुणाच्या वाट्याला आल्या, तर त्यावर विश्वास ठेवणे आपल्याला भाग पडते. अशा गोष्टी योगायोग म्हणून सोडून देता येणे वैज्ञानिक वृत्तीच्या माणसाला तर फार कठीण वाटते.

आपली कथेची सुरुवात इ.स. १७६५ पासून सुरू होते. मराठ्यांचा इतिहास, स्वामी सारख्या कादंबरी इ. बहुश्रुत असल्याने आपल्याला माहिती आहे की मराठ्यांच्या राज्याचे शाहूमहाराजांचे पेशवे हे पंतप्रधान असत. वंशपरंपरेने हे पेशवेपद लाभत असल्याने पेशव्यांचा जो वारस त्याला हे पद मिळत असे.

आपणा सर्वांना माहीत आहेच की वारस नसताना राघोबादादा जे पेशव्यांचे चुलते यांना आपण स्वतः पंतप्रधान व्हावे यासाठी त्यांनी पेशवे सवाई माधवरावांच्या पश्चात अनेक कटकारस्थाने, बंड इ. मार्ग अवलंबला होता. याच राघोबादादांनी इ. स. १७६५ साली आपल्या पुतण्याचा अडसर बाजूला करण्यासाठी अघोरी पंथाचे सहाय्य घेण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी कोत्तारकर गुरुजी जे म्हैसूर येथे अघोरपंथीय होते, त्यांचे सहाय्य घेतले.



प्रतिकात्मक मूर्ती

या गुरुजींनी राघोबादादांना पूजेत ठेवण्यासाठी तांडवनृत्य (मृत्यू, विध्वंस निर्देशक) करणाऱ्या गणपतीची पंचधातूची दीडफूट उंचीची मूर्ती मंत्रून दिली. देताना जे या मूर्तीच्या सहवासात येतील त्यांचा गंभीररीत्या विध्वंस होईल हे बजावून सांगितले गेले.

पेशवे माधवरावांच्या मृत्यूनंतर राघोबादादांचा पुतण्या नारायणराव हे गादीवर आले. पण पुढील कथा आपल्याला विदीत आहे, की याच राघोबादादांनी व त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी कट रचून गारद्यांकरवी नारायणरावांच्या खुनाचा घाट घातला.

जेव्हा खुनी नारायणरावांवर हल्ला करण्यास आले त्या वेळी जीव वाचवण्यासाठी नारायणराव राघोबादादांच्या कक्षात पळत आले. येथे इतिहास नोंदीप्रमाणे राघोबादादा व तांत्रिक या गणपतीची पूजा करत होते. तेथेच नारायणरावांचा निर्घृणपणे खून करण्यात आला व मूर्तीवर रक्ताचा अभिषेक झाला.

अघोरी तांडवमूर्तीने अशा अघोरी पद्धतीने पहिला बळी मिळवला. पण या खुनाने राघोबादादाला पाहिजे असलेले पेशवेपद कधीच मिळू शकले नाही. त्यांना उलट देहांत प्रायश्चित्त फर्माविण्यात आले. जन्मभर अवहेलना सहन करून नजरकैदेत राहावे लागले. त्यांचा मृत्यूसुद्धा हालअपेष्टेतच आजारी पडून झाला.

पुढे ही मूर्ती शनिवारवाड्यातील शेडणीकर या कारभाऱ्याने चोरली व पुण्यातून प्रथम चिंचवड व नंतर वाई येथे हलवली व तेथून ती साताऱ्यात एका ब्राह्मणापर्यंत पोहोचवली. पण चिंचवड, वाई व सातारा येथे ज्यांच्याकडे ती देण्यात आली तेथे– तेथे ही मूर्ती बाळगणाऱ्या घरातील लोकांचे अपमृत्यू, कष्टदायी रोग, वेड लागणे अशा पद्धतीने शेवट होऊ लागल्याने घाबरून साताऱ्यात एका प्रचंड विहिरीत मूर्ती विसर्जित करण्यात आली. तशा अवस्थेत ती पुढे ६० वर्षे होती.

पण पुढे ६० वर्षांनी एक साताऱ्यातील प्रसिद्ध संन्यासी ज्यांना स्वामी सच्चिदानंद म्हणून ओळखले जायचे त्यांच्या स्वप्नात ही मूर्ती सतत येऊ लागल्याने सातारा येथील श्री. वामनराव कामत या आपल्या शिष्याला ती शोधून काढण्यासाठी त्यांनी सांगितले.

पण श्री. वामनराव कामतांनी ती काढावयाचे बाबतीत टाळंटाळ केली. पण गुरू गोडबोले यांच्या स्वप्नात वारंवार ती मूर्ती आपला उद्धार करावा असे सांगू लागली. म्हणून गुर्वाज्ञा म्हणून ती मूर्ती विहिरीतून काढून साताऱ्याला त्यांच्या घरी त्याची प्रतिष्ठापना केली.

मूर्तीने लगेचच आपला प्रताप दाखवला. श्री. वामनराव कामतांचे घरातील एकूण एक

पान क्र. २९ वर

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **+91251 2482106, +91251 2483476.**
•**SHOP NO.1:** Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - **97026 55000.**
•**SHOP NO.2:** Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - **+91251 2433193. Mo. - 9702811122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS

**DISTRIBUTORS FOR**
**Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico), Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy**

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351**. Email: **anakhye@gmail.com**

finVantage

**EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO, Mutual Fund, Realty, Life and General Insurance, PMS and Financial Planning Advisory**

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**

**पान क्र. २७ वरून**

सर्व माणसे विचित्र पद्धतीने मृत्यू पावली.

१९३७ साली सर्वांत शेवटी श्री. वामनराव कामतांचाही मृत्यू अत्यंत कष्टदायकरीत्या झाला. साताऱ्यातील कामतांच्या घराण्याचा नाश झाल्याने कामतांच्या नातेवाइकांनी ही मूर्ती पूजेतून दुसरीकडे ठेवली. १९४६ मध्ये सौ. चिपळूणकर यांनी ती मूर्ती स्वतःकडे आणली. याचवेळी मुंबईतील श्री. मोघे हे एक प्राचीन वस्तुसंग्रह करणारे एक धनाढ्य रसिक होते. त्यांच्या वस्तुसंग्रहालयात हा गणपती एक ऐतिहासिक मूर्ती म्हणून ठेवावी असे मनात आले व त्यांनी आपले साताऱ्याचे स्नेही श्री. डी. एस. बापट यांच्याकडे ती कामगिरी दिली.

त्या दरम्यान सौ. चिपळूणकरांना पक्षाघात झाला. श्री. बापट यांचे स्नेही श्री. सोनटक्के यांनी ती मूर्ती साताऱ्याहून सौ. चिपळूणकरांकडून मुंबईला मोघेंच्या वस्तुसंग्रहालयात आणण्याचे काम स्वीकारले. श्री. सोनटक्केंनी मुंबईला रात्रीचा प्रवास नको म्हणून घरात ही मूर्ती ठेवली व त्यांची बायको जी गर्भवती होती, तिचा सकाळी गर्भपात झाला.

श्री. सोनटक्केंनी ही मूर्ती श्री. मोघेंकडे वस्तुसंग्रहालयासाठी दिली. थोड्याच दिवसात मोघ्यांच्या मुलाला वेड लागले. धनाढ्य मोघेंचे सर्व ऐश्वर्य लयाला जाऊन ते दिवाळखोर म्हणून धंद्यात जाहीर झाले.

# सत्यकथा अघोरी तांडव, गणपती मूर्तीच्या थैमानाचे!

श्री. मोघ्यांनी त्यांचे मित्र केशवशास्त्री अय्यंगार यांच्या सल्ल्यावरून ती तांडव मूर्ती नष्ट करण्यासाठी त्यांचेकडे मुंबईत सुपूर्त केली.

श्री. केशवशास्त्री अय्यंगार ती मूर्ती घेऊन कांचीच्या शंकराचार्यांकडे सल्ला मागण्यास त्यांच्यासमोर घेऊन गेले. पण ते पोहोचेपर्यंत त्यांची पत्नी व मुलगा अतिशय आजारी झाले.

कांचीच्या शंकराचार्यांनी एकवार त्या मूर्तीकडे पाहिले व श्री. अय्यंगार यांना ती मूर्ती ताबडतोब डोळ्यांसमोरून हलवण्याची आज्ञा देऊन कुठल्याही पवित्र स्थळी ती नेऊ नये, असे श्री. अय्यंगारांना सांगितले.

तोपर्यंत इकडे श्री. अय्यंगारांची पत्नी व मुलाचा मृत्यू ओढवला.

येथे १९६० साली त्या मूर्तीचे विर्सजन करण्यासाठी अय्यंगारांनी ती मूर्ती मद्रास येथे शंकरमठ थंबू चेट्टी रस्ता येथे सुपूर्त केली.

यापुढे त्या मूर्तीचे काय झाले भगवानच जाणे.

पण सत्य हे काही वेळा कादंबरीपेक्षाही कल्पनाशक्तीच्या तारतम्य भावाच्या, श्रद्धेच्या पलीकडे असते, हेच खरे.

मला, वैज्ञानिक असूनही असेही असते, असू शकते हे मनाला पटवणे भाग पडते.

या सत्यघटनेविषयी अधिक जाणून घ्यावयाचे असल्यास खालील संदर्भग्रंथ रसिकांनी जरूर वाचावेत–

१) पेशवे घराण्याचा इतिहास : डॉ. प्रमोद ओक

२) भारत इतिहास संशोधन मंडळ (Vol. २८) Chapter १–२

**– डॉ. प्रमोद मोघे**
**(निवृत्त) वरिष्ठ शास्त्रज्ञ**
फो.नं. ९३२५३८००९३

**WITH BEST COMPLIMENTS FROM**

**मे. डी.व्ही. भाटवडेकर क्लॉथ मर्चंटस्**

फोन नं. – २४४५६०४७
६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

**कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँटस्**

**अधिकृत विक्रेते**
**युनायटेड होजिअरी – कॅप्टन होजिअरी**


**निकेत फोटोज्**
**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**

# नरेन्द्र पानवलकर : एक बहुआयामी व्यक्तिमत्व



नरेन्द्र हरिश्चंद्र पानवलकर (जन्म : ३ ऑक्टो. १०४७) यांनी टेक्स्टाईल टेक्नॉलॉजीमध्ये उच्च शिक्षण घेतले व इन्व्हेस्टिगेटरपासून प्रॉडक्शन मॅनेजरपर्यंत विविध पदांवर ३४ वर्षे नोकरी व टेस्क्टाईल मशिनरी मॅन्युफॅक्चरिंग कंपन्यांमध्ये अनेक वर्ष सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून कार्य केले. अनेक सामाजिक – आर्थिक संस्थांमध्ये अध्यक्ष म्हणून काम पाहिले. समाजकार्याचे बाळकडू त्यांना लहानपणीच मिळाले. लहान वयातच कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी अनेक छोटी–छोटी कामे केली. त्यातूनच व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या कौशल्यांचा नकळत विकास होत गेला.

वयाच्या १५व्या वर्षी संस्कार मंडळ, बडोदा येथे कार्यवाह म्हणून काम पाहिले. त्यानंतर अनेक संस्थांमध्ये कार्यवाह, उपाध्यक्ष, अध्यक्ष, विश्वस्त अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. यातूनच वेगवेगळ्या संस्थांच्या महोत्सवी कार्यक्रमांचे आयोजन करण्यातही ते अग्रेसर ठरले.

या सगळ्यांच्या अनुभवाने सतत कार्यरत राहण्याची प्रेरणा मिळत गेली. त्यांनी अनेक संस्थांचे, अनेक फर्मचे संपूर्ण व्यवस्थापन केले इतकेच नव्हे तर इतरही विशेष म्हणता येतील अशी कामे म्हणजे सहवक्ता, इंग्रजीचे गुजरातीमध्ये भाषांतर, एका सूत गिरणीसाठी सल्लागार अशीही कामे सहजगत्या केली. श्री. पानवलकर यांचे बहुआयामी कार्यकर्तृत्व खरोखरच प्रशंसनीय आहे.

## तुला वारसा सावित्रीचा

भवताली जग बदलत राहो चिंता त्याची करू नको
स्त्री असण्याचा गर्व असू दे कमीपणा तू मानू नको ।।धृ.।।
तुला वारसा सावित्रीचा तेज तिचे तू विसरू नको
सीतेपरि कर अग्निदिव्य तू पाऊल मागे घेऊ नको
झाशीवाल्या मर्दानीचा कधी पराक्रम विसरु नको
अबला म्हणुनी मागे फिरुनी रडत कधी तू बसू नको
स्त्री असण्याचे दुःख नको – दुबळेपण तू धरू नको
अन्यायापुढे झुकू नको – भलेपणा तू टाकू नको
तुझा तूच हो दीप जीवनी अंधारामागे बसू नको।
।।स्त्री असण्याचा।।
वरपक्षाची तुझीच बाजू चढून तू परि जाऊ नको
काय मागणे किती मागणे याची यादी करू नको
दोन घरांचे जुळते नाते विवाह हा व्यापार नको
तुझ्याच हाती सत्ता सारी दुरुपयोग तू करू नको
हुंड्यासाठी हटू नको – सोने नाणे मागू नको
मानापानाला अडू नको – भलती हाव तू धरू नको
देण्याघेण्यानं काय साधतं? मन छोटे तू करू नको
।।स्त्री असण्याचा।।
परघरची तू लेक आणिसी सुनेस परके मानू नको
तुझी लेक पण सून कुणाची तिची काळजी करू नको
मुलगी झाली काय बिघडले? मुलग्यासाठी झुरु नको
मुलगा, मुलगी दीप कुलाचे कोते मन तू करू नको
मुलगी झाली चिडू नको – हवाच मुलगा म्हणू नको
दोष सुनेला देऊ नको – राख डोक्यामधे घालू नको
अपुल्या वेड्या हट्टापायी सून आपली जाळू नको
।।स्त्री असण्याचा।।
परस्परांवर प्रेम करावे द्वेष मनामध्ये आणू नको
कुटुंबसंस्था जपून ठेवी मोडतोड तू करू नको
संस्कारांचा अमोल ठेवा उधळुनिया तू देऊ नको
तूच प्रतिनिधी नव्या पिढीची विसरुनिया तू जाऊ नको
देहप्रदर्शन करू नको – नीती सोडून वागू नको
अनुकरणाचे वेड नको – स्त्रीमुक्तीचे बंड नको
या देशाचा मान वाढवी अपकीर्ती तू करू नको
स्त्री असण्याचा गर्व असू दे कमीपणा तू मानू नको.

**– सौ. प्रिया प्रकाश हळबे**



# पाणी वाचवण्याचे घरातील सहज करण्याजोगे उपाय

१) स्वयंपाकघरात भाज्या/ डाळ/ तांदूळ धुतानाचे पाणी, भांडी, पातेली, ग्लास, कपबश्या, साबणाशिवाय विसळतानाचे पाणी, पाणी प्यायल्यावर अर्धवट राहिलेले पाणी, मोठ्या पातेल्यात साठवावे. हे सर्व पाणी घरातील झाडांना, सोसायटीतील झाडांना घालता येते. घरात झाडे नसल्यास रस्त्यावरील झाडांना घालावे.

या सोप्या उपायाने ५ माणसांचे कुटुंब साधारणपणे दिवसाला १० ते १५ लिटर पाणी वाचवू शकते.

२) जेवताना पाण्याचे तांब्या-भांडे जवळ ठेवावे त्यामुळे हवे तेवढेच पाणी घेतले जाते व वाया कमी जाते.

३) पिण्याचे पाणी भरण्यापूर्वी पहिले पाणी ओतून देऊ नये. पाणी कधीही शिळे होत नाही.

४) आपले वाहन दुचाकी किंवा चारचाकी बादलीत पाणी घेऊन धुवावे, नळीने नव्हे. याने १०-१५ लि. पाणी वाचते.

५) बागेला पाणी घालताना झाडांच्या मुळांशी पाणी घालावे. झाडांना अंघोळ घालू नये.

६) झाडांच्या मुळांशी मातीची गोल आळी करावीत. म्हणजे पाणी वाहून जाणार



नाही. यामुळे निम्या पाण्यात काम होते.

७) सर्वसाधारणपणे खरकटी भांडी बेसिनमध्ये साठवून त्यात पाणी ओतले जाते. भांडी घासायच्या आधी हे पाणी एका पातेल्यात ओतून झाडांसाठी वापरता येते.

८) संडासच्या फ्लशटाकीमध्ये १ लिटरच्या ४/५ पाण्याच्या बाटल्या भरून बंद करून ठेवता येतात, त्यामुळे ४/५ लिटर पाणी वाचते. तसेच बॉलकॉक ॲडजेस्ट करून पाण्याची पातळी कमी करता येते. या उपायांनी ५ माणसाचे कुटुंब साधारणपणे दिवसाला ५० लिटर पाणी वाचवू शकते.

९) ज्यांच्याकडे गच्ची अथवा गॅलरी आहे. तिथे पावसात पाण्याच्या बादल्या अथवा वापरात नसलेली मोठी पातेली/ पिप ठेवल्यास त्यात भरपूर पाणी साठते. ते पाणी नंतर झाडांना अथवा मोरीत, फरश्या पुसण्यासाठी वापरता येते.

पाणी वाचवण्याचे अवघड उपाय

१) फरशी पुसलेल्या पाण्यात फिनेल, डेटॉल असते, ते पाणी संडासामध्ये वापरावे.

२) कपडे पिळलेल्या पाण्याने संडास, बाथरूम धुवावे.

अवघड व खर्चिक

१) वॉशिंग मशीनचे पाणी वेगळे साठवून संडास, बाथरूममध्ये वापरता येते. शक्य असल्यास ते पाणी फ्लशटाकीत साठवता येते.

२) अंघोळ करताना पाय बादलीत सोडून बसल्यास बरेच पाणी बादलीत साठते व ते पाणी फ्लशसाठी अथवा फरशी पुसण्यास वापरता येते.

३) बागेसाठी ठिबक सिंचनाची रात्री आपोआप चालू होणारी व २ तासांनी बंद होणारी यंत्रणा बसविणे.

४) पावसाचे पाणी साठविण्यासाठी वेगळी टाकी बांधणे.

## असे पाणी वाचवा

'पाणी नाही', अशी ओरड आपण नेहमीच करत असतो; परंतु पुढीलप्रमाणे पाण्याचा वापर केल्यास प्रत्येक माणसामागे किती लिटर पाणी वाचवू शकतो, याचा विचार करू.

| अ. नु. | कृती | करा | करू नका | किती पाणी वाया जाते |
|---|---|---|---|---|
| १ | ब्रश करणे | ग्लास किंवा टंबलर वापरा. अर्धा लिटर पाण्याचा वापर | तीन मिनिटे नळातून पाणी सोडल्यास | ६ लिटर |
| २ | तोंड-हात धुणे | अर्धी बाटली पाणी. तीन लिटर पाण्याचा वापर | पाण्याच्या नळातील २ मिनिटे | ४ लिटर |
| ३ | दाढी करणे | कपामध्ये पाणी अडीच कप-पाव लिटर | दोन मिनिटे नळातून पाणी सोडणे | ४ लिटर |
| ४ | अंघोळ करणे | १ बादली पाणी घ्या. नळ बंद करा. १५ लिटर पाण्याचा वापर | शॉवर चालू करून साबण लावणे. | ४५ लिटर |

**वरील तक्त्यावरून असे समजते, की बरेच पाणी केवळ आपल्या निष्काळजीपणामुळे वाया जाते.**



**अक्षय्यतृतीयेचे माहात्म्य :** ❊ जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो पापांतून मुक्त होतो. ❊ या दिवशी परशुरामाची पूजा करून त्यांना अर्घ्य दिले जाते. ❊ शुभ कार्ये या दिवशी होतात. ❊ श्रीकृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते, की 'या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणून हिला अक्षय्यतृतीया असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य (अविनाशी) होते.

## With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**

PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664 E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.



DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10




**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450











**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net


इन्शुरन्स स्पेशालिस्ट
सुरक्षित करा आपले भवितव्य
सर्व प्रकारच्या विमा योजना
एकाच ठिकाणी उपलब्ध.
१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा(ग्रुप इंन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा
मंगेश जांभेकर
मोबाईल : ९८१९७ ५०९५५
Email : mangesh.jambhekar@gmail.com
Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society
M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057


सुयश कॅटरर्स
१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा
आपुलकीने सेवा देणारी माणसं
माऊली हॉल
मिनी माऊली हॉल
सर्वेश हॉल
मंगलमूर्ती सभागृह
ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.
संपूर्ण व्यवस्थापन
सुहास व स्वाती पंडित
यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३
अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९
सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

॥श्री॥

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

# ज्योती एन्टरप्रायझेस

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व
सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,
फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे

(व्यवस्थापन)

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्‌गुरू

॥श्री दिगंबरदास महाराज॥

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

**WITH BEST COMPLIMENT FROM:**

## J.P.F METACAST PVT LTD

PLOT NO. 7, 16, 29 MACCHE INDUSTRIAL ESTATE
BELGAUM - 590014 KARNATAKA, INDIA
Ph: 0831-2440664 Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com
www.jpfmetacast.com

***Manufacturers of all types of Cast iron and Ductile Iron castings***

- An ISO 9001 : 2008 certified company
- Winner of National Quality Award in SSI - 1998
- Winner of Rajeev Gandhi National Quality Award - 2007
- Winner of Jayaswal Neco Best Quality award from Institute of Indian Foundrymen - 2012
- Winner for Best Operations Management from S.P.Jain Institute of Management and Research, Mumbai 2014

**Industries Served :** Diesel Engines, Tractors, Compressors, Road construction Machineries, Machine Tools ,etc

